139

फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग

# जिल्हा परिषदेच्या शाळा व शासकीय आश्रमशाळा यांच्या शैक्षणिक दर्जाचा तुलनात्मक अभ्यास
# १९९५-९६

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१.

**१९९६**

# प्र स्ता व ना

'शिक्षण' हा मानवाच्या प्रगतीतील अत्यंत महत्वाचा घटक आहे. एखाद्या समाजातील शिक्षणाचे प्रमाण जेवढे अधिक तेवढा तो समाज प्रगत आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. आदिवासी जमातीमध्ये शिक्षणाचा प्रसार अद्यापही मंद गतीने होत आहे. शिक्षणाच्या प्रक्रीयेमध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षण विभागाचे अधिकारी या सर्वांनीच स्वत:ची जबाबदारी सांभाळली तर शिक्षण घेणाऱ्यांची संख्या व दर्जा यात वाढ होईल, यात शंकाच नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात, महाराष्ट्र राज्यात प्राथमिक शिक्षण प्रसाराचे काम जिल्हा परिषदांच्या शाळांमार्फत मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आले व आजतागायत हे सुरु आहे. राज्यातील आदिवासी भागातील आदिवासी बांधवाची कठीण आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी शासनाने सन १९७२ सालापासून 'आश्रमशाळा' उघडण्याचे धोरण अंगीकारले आहे व ते आजही चालू आहे. अशाप्रकारे महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाचे काम मुख्यत: जिल्हा परिषदांच्या शाळा व शासकीय आश्रमशाळांद्वारे केले जाते.

इयत्ता १ ली मध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण इ.१० वी पर्यंत टिकून राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणातील दरी जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत शैक्षणिक विकासाची गती वाढली आहे, असे म्हणता येणार नाही. विशेषत: आदिवासी मुला-मुलींच्या गळतीकडे व शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे.

महाराष्ट्रामध्ये अति दुर्गम भागापर्यंत आश्रमशाळा स्थापन झाल्याने आदिवासींच्या शिक्षणाचे प्रमाण हळूहळू वाढत आहे, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. 'आश्रमशाळा' म्हणजे आदिवासी समाजाच्या उन्नतीचे एक महत्वाचे पाऊल आहे. आदिवासी क्षेत्रात जिल्हा परिषदांमार्फतही शैक्षणिक कार्य केले जाते. प्रस्तुतच्या मूल्यमापन अहवालात आश्रमशाळा व जिल्हा परिषदांच्या शाळांच्या शैक्षणिक दर्जाचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. यासाठी महाराष्ट्रातील सर्व आश्रमशाळांमध्ये व जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये जाऊन तपासणी करणे केवळ अशक्य असल्याने काही निवडक शाळांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने अहवालामध्ये काढण्यात आलेले निष्कर्ष सर्व आश्रमशाळा व सर्व जिल्हा परिषदांच्या शाळांना लागू पडतील यात शंका वाटत नाही.

शाळांचे घरापासून अंतर, क्रीडांगण, शाळांमध्ये कोणकोणत्या प्रकारचे शिक्षण दिले जाते, दैनंदिन अध्यापन पध्दती, शाळेतील शैक्षणिक उपक्रम, शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या भेटी, तपासणी, गळतीची कारणमिमांसा इ.अनेक बाबींचा शाळेच्या शैक्षणिक दर्जावर काय परिणाम होतो, इ.बाबींचा उहापोह प्रस्तुत अहवालामध्ये विस्ताराने करण्यात आला आहे.

प्रस्तुत अहवालासाठी लागणारी सांख्यिकी माहितीसह मूल्यमापन अहवाल तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी या संस्थेतील सौ.मंगल घोडे, संशोधन अधिकारी, यांनी पार पाडली. तसेच संस्थेतील उपसंचालक, श्री.डी.एम.रासकर, यांनी योग्य सूचना व मार्गदर्शन केले. तसेच अहवालाचे टंकलेखन व डी.टी.पी.चे काम श्री.कि.पां.कुर्डे, लघुटंकलेखक, यांनी केले. हा अहवाल तयार करण्यासाठी ज्या जिल्हा परिषदेच्या व आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांनी प्रश्नावलीमार्फत माहिती पाठविली, त्यांची ही संस्था आभारी आहे.

प्रस्तुतचा मूल्यमापन अहवाल आश्रमशाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक, जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षण विभागाचे अधिकारी, आदिवासी विकास विभागाचे अधिकारी यांना उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे. तसेच या अनुषंगाने शासनास व आदिवासी विकास आयुक्तालयास काही धोरणात्मक निर्णय घेणे क्रमप्राप्त ठरेल, अशी आशा वाटते.

पुणे

दिनांक २९-६-१९९६

(डॉ.नवीनचंद्र जैन)
संचालक
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | | पृष्ठक्रमांक | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| १. | महाराष्ट्र राज्यातील शिक्षणावर दृष्टीक्षेप | | ४ | ११ |
| २. | मूल्यमापन अभ्यासाची पार्श्वभूमी, उदिष्टये आणि सर्वेक्षण पध्दती | | १२ | १६ |
| ३. | आठव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ‘सामान्य शिक्षण‘ योजनेचे स्वरुप | | १७ | २५ |
| ४. | सर्वेक्षणात गोळा केलेल्या सांख्यिकी माहितीचे पृथःकरण | | २६ | ३८ |
| ५. | निरिक्षणात्मक बाबी व आदिवासी क्षेत्रातील शाळांचा शैक्षणिक दर्जा | | ३९ | ४७ |
| ६. | सूचना तथा शिफारशी | | ४८ | ५५ |
| ७. | प्रपत्र क्र.१ | मुख्याध्यापकांनी भरावयाचे पत्रक | ५६ | ५९ |
| ८. | प्रपत्र क्र.२ | शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी भरावयाचे पत्रक | ६० | ६१ |

प्रकरण क्र.१

# महाराष्ट्र राज्यातील शिक्षणावर दृष्टीक्षेप

## सध्याची भारतीय शिक्षण पध्दती

शिक्षण हा माणसाचा 'तिसराडोळा' समजला जातो. भारतीय शिक्षणातील मूलभूत समस्यांचा विचार करण्यापूर्वी भारतीय शिक्षणाचे ऐतिहासिक समालोचन करणे आवश्यक आहे. सध्याच्या शिक्षण पध्दतीबाबत एक प्रसिध्द शिक्षणतज्ञ म्हणतात, की 'सध्याचे भारतीय शिक्षण हे' भारतीय' ही नाही, आणि 'शिक्षण' ही नाही. देशातील समाजाच्या गरजा, आशा, आकांक्षा पूर्ण करण्याचे सामर्थ्य शिक्षणात नसेल तर शिक्षण हे टाकाऊ आहे.

कोमिनिअस या शिक्षण तज्ञाने शिक्षणाची केलेली व्याख्या आजही ताजी वाटते- '' घरी किंवा शालेय संस्थेतून लागणारे वळण हे केवळ शिक्षण नव्हे, मानवाच्या समग्र जीवनावर परिणामकारक होणारी आणि त्याच्या व्यक्तीगत सामाजिक जीवनात असंख्य प्रसंगी एकवाक्यता निर्माण करण्यास मदत करणारी प्रक्रीया म्हणजे शिक्षक.''

घटनेतील तरतूदीप्रमाणे शिक्षण ही बाब राज्याच्या कक्षात येते. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने ''शिक्षणाचे राष्ट्रीय धोरण'' (Publication No.832-1968) या मसुद्यात प्रसिध्द केले आहे-

*The Government of India is convinced that a radical reconstruction of education on the broad lines recommended by the Education commission is essential for economic and cultural Development of the country for national integration and for realizing the ideal of a socialistic pattern of society. This will involve a transformation of the system which will relate if more closely to the life of the people; a sustained and intensive effort to raise the quality of education at all stages, an emphasis on the development of science and technology and cultivation of moral and social values.*

संदर्भ- शैक्षणिक प्रश्न, पुनर्रचना आणि राष्ट्र विकास- प्रा.एम.जी.माळी

यावरुन देशाच्या आर्थिक, सांस्कृतिक विकासासाठी आणि राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीने सध्याच्या शिक्षण पध्दतीला विशिष्ट असे भारतीय वळण देऊन ती आजच्या विज्ञान युगात अद्ययावत असेल अशी दक्षता घेण्याची

जरुरी कशी आहे, हे स्पष्ट होईल. अशी दक्षता घेतली तरच आपला देश योग्यरित्या प्रगती करु शकेल व प्रगत देशाच्या निदान जवळपास जाईल.

१.२ १९६४-६६ चा कोठारी आयोगाचा अहवाल-

डॉ.कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमल्या गेलेल्या भारतीय शिक्षण आयोगाने (Indian Education Commission) हे स्पष्ट केले की, देशाचे भवितव्य हे देशातील लोकांना कोणत्या प्रकारचे शिक्षण मिळते यावर अवलंबून असते. आयोगाने असाही इशारा दिला आहे की, भारतीयांना जर प्रभावी शिक्षण मिळाले नाही तर देशाचे भवितव्य धोक्यात येईल. शिक्षण हे समाजाच्या गरजा, आशा आणि आकांक्षा पूर्ण करणारे पाहिजे, म्हणून शिक्षणाद्वारे श्रम व समाजसेवा करण्याची संधी शाळेतच मिळाली पाहिजे. माध्यमिक शिक्षण पातळीवर शाळा विकासाच्या योजनेअंतर्गत उत्पादक व्यवसाय किंवा कार्यानुभव अशा विविधतापूर्ण अभ्यासक्रमावर भर दिला आहे. सर्वच स्तरावरील शिक्षण विकासाची जी महत्वपूर्ण योजना या आयोगाने सादर केली आहे. त्यामध्ये माध्यमिक शिक्षणाला विशेष स्थान आहे.

१.३ महाराष्ट्र राज्यातील आदिवासींसाठी शिक्षण-

आदिवासी व त्यांचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य असलेले क्षेत्र यांना भारतीय राज्यघटनेत विशेष संरक्षण देण्यात आले आहे. भारतीय घटनेच्या कलम (४६) अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी खास तरतूद करण्यात आली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासींचे शिक्षणासाठी काही प्रयत्न झालेले दिसतात. त्यात ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून महाराष्ट्रात इ.स.१९२० मध्ये ठाणे जिल्ह्यातील पालघर, डहाणू व उंबरगांव येथे प्राथमिक शाळा उघडल्या गेल्या. तथापि, अनेक कारणांनी त्या शाळा फार काळ चालल्या नाहीत. नंतरच्या काळात विविध संस्था व व्यक्तींनी आदिवासींच्या विकासासाठी शिक्षण हे मध्यवर्ती सूत्र कल्पून कार्य केले.

१.४ मुंबई सरकारच्या शिक्षण खात्याने आदिवासींच्या शिक्षणातील महत्वाची अडचण म्हणजे, त्यांची 'आर्थिक दुर्बलता' हे शासनाच्या निदर्शनास आणून दिले. १९२८ साली नेमलेल्या 'स्टार्ट समितीने' आदिवासींच्या शिक्षणाचा वेग वाढविण्यासाठी शाळांना जोडून 'वसतीगृहे' काढण्यात यावीत, असे सुचविले.

१९३८ साली डी.सिमिंग्टन, आय.सी.एस.या अधिकाऱ्याने आपला अहवाल सादर केला. त्यांनी आपल्या अहवालात आदिवासींच्या शिक्षणासाठी आश्रमशाळा काढण्यात याव्यात व प्राथमिक शिक्षण सक्तीचे

करण्याचे करण्यात यावे, ह्या शिफारशी केल्या. १९४२ साली नेमलेल्या मॅकमिलन समितीने मागास जमातीच्या विकासासाठी खास वेगळा निधी ठेवण्यात यावा, अशी महत्वाची शिफारस केली. १९४७ साली श्री.वांद्रेकर यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासींच्या विकासाबाबत विचार करण्यासाठी समिती नेमण्यात आली होती. आचार्य भिसे या समितीचे सदस्य होते. ठाणे जिल्हयातील आदिवासींचा विशेष अभ्यास करुन समितीने आपल्या अहवालात शासनाला खालील महत्वाच्या सूचना केल्या.

१. आदिवासी क्षेत्रात ‘सक्तीचे प्राथमिक शिक्षण‘ असावे.

२. दर दहा प्राथमिक शाळांत एक ‘मध्यवर्ती‘ शाळा असावी

३. आश्रमशाळेला जोडून ‘वसतीगृहाची‘ व्यवस्था असावी.

४. आश्रमशाळेच्या स्वतंत्र ‘इमारती‘ व शिक्षकांना ‘निवासस्थाने‘ बांधावीत.

५. शेती शिक्षणाची व्यवस्था व्हावी.

या समितीच्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचे शासनाने ठरविले व १९५४ साली जव्हार तालुक्यातील ‘तलवडे‘ या गांवी पहिली आश्रमशाळा उघडण्यात आली. या आश्रमशाळेद्वारे आदिवासी शिक्षणाला गती देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

योजना आयोगाने शिक्षण विषयक धोरण ठरविण्यासाठी नेमलेल्या ओ.शि.ओ.कमिटीने १९६९ साली आपल्या अहवालात शिक्षणाबाबत खालील महत्वाच्या शिफारशी केलेल्या आहेत.

१. प्राथमिक शिक्षणास पूर्व प्राथमिक शिक्षणाची जोड देण्यात यावी व बालवाडी सुरु करण्याच्या योजनेस उत्तेजन द्यावे.

२. ज्या एक शिक्षकी शाळांचे काम असमाधानकारक आहे, त्या बंद करुन त्या भागात आश्रमशाळा सुरु करावी.

३. आदिवासी मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न स्वतंत्रपणे हाताळला पाहिजे. याकरिता नेहमीच्या शिक्षणाबरोबर त्यांना गृहशास्त्राचे शिक्षण दिले जाईल. अशा स्वतंत्र आश्रमशाळांची सूचना समितीने केलेली आहे.

४. चांगल्या शिक्षकांना आदिवासी भागात आकर्षित करण्यासाठी मोफत राहण्याची घरे आणि जादा खास वेतन यासारखी आकर्षणे आवश्यक आहेत.

१.५ सर्वसाधारणपणे, अनुसूचित जमातींमध्ये शिक्षणाबद्दल उदासिनता दिसून येते. कारण या समाजामध्ये पारंपारिक व्यवसाय करण्याकडे लोकांचा जास्त ओढा असतो. मुली आईला घरकामाला मदत करतात. इतर वेळी गुरे सांभाळतात. लाकूडफाटा, गवत, कंदमुळे, इ.वस्तु गोळा करण्यास मदत करतात. तर

मुले शेतीच्या हंगामात शेतीवर काम करतात व इतरवेळी गुरे सांभाळतात. शेती करणे, शिकार करणे, गुरे सांभाळणे, मासे मारणे,पाणी भरणे, लहान भावंडांना सांभाळणे इ.अर्थप्राप्ती करुन देणारी कामेही करतात. त्यामुळे शिक्षण घेऊन फार मोठा फायदा होईल. असे त्यांना वाटत नाही. मुलांची शाळेमध्ये नोंद झाल्यावर बऱ्याच जणांचे शिक्षण काही वर्षातच थांबते. मुलींचे शिक्षण त्या मानाने लवकर थांबते. त्याची विविध कारणे काय असतील याचा साकल्याने विचार करण्याची अत्यंत गरज आहे.

१.६ महाराष्ट्र राज्यातील १९६१ ते १९९१ च्या खानेसुमारीनुसार गेल्या ४० वर्षातील सर्वसामान्य व अनुसूचित जमाती यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण पाहिले असता स्वातंत्र्यानंतरही आपण शिक्षण क्षेत्रात फारशी प्रगती करु शकलो नाही, असे दिसून येते.

तक्ता क्र.१.१

महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांचे व आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण

| अ. क्र. | वर्ष | सर्वसामान्य साक्षरता टक्केवारी | | | आदिवासी साक्षरता टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १. | १९६१ | ४२.०४ | १६.७६ | २९.८२ | १२.५५ | १.७५ | ७.२१ |
| २. | १९७१ | ५१.०४ | २६.४३ | ३९.१३ | १९.०६ | ४.२१ | ११.७४ |
| ३. | १९८१ | ५८.६५ | ३४.६३ | ४७.०२ | ३२.३८ | ११.९४ | २२.२९ |
| ४. | १९९१ | ७६.५६ | ५२.३० | ६४.८७ | ४९.०८ | २४.०३ | ३६.८७ |

संदर्भ- १९६१ ते १९९१ च्या जनगणनेनुसार.

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, १९६१ च्या तुलनेने १९९१ मध्ये आदिवासी साक्षरता दर वाढला आहे. तसेच सर्वसाधारण गटातील साक्षरताही वाढलेली आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार जवळ जवळ ६३% आदिवासी आजही निरक्षर आहेत. शिक्षणासाठी कोट्यावधी रुपये खर्च करुन सुध्दा स्वातंत्र्यानंतर भारतातील साक्षरतेचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे वाढू शकले नाही. याचाच अर्थ दुर्गम भागातील अनुसूचित जमातीच्या लोकांना शिक्षणाचे महत्व अद्याप म्हणावे तितकेसे पटलेले दिसत नाही.

शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या बाबतीतीला सर्वसाधारण अनुभव आणि त्यांचेवरील संशोधनाचे निष्कर्ष पाहिले असता असे दिसून येते की, ६ ते ८ वयोगटातील मुला-मुलींची नांवे शाळांत मोठ्या प्रमाणावर नोंदली जातात. परंतू त्यानंतर सुमारे ६० % मुले/मुली शिक्षण अर्धवट सोडून जातात. यामध्ये मुलींचे प्रमाण अधिकअसते.

१.७ शिक्षण व अर्थव्यवस्था एकमेकांना पूरक आहेत. शिक्षणाचे धोरण अर्थव्यवस्थेशी सुसंगत असावयास हवे. पालक मुलांना शाळेत न पाठविण्याची सर्वसाधारण कारणे ही आर्थिकच आहेत. आदिवासींमध्ये शिक्षण प्रसार करणे हे बऱ्याच अडचणीचे आहे. पालक मुलांना आर्थिक कारणासाठीच शाळेपासून वंचित ठेवतात. उदा.पाल्याने शेतात काम करणे, गुरे सांभाळणे, लहान भावंडांना सांभाळणे, घरकामात मदत करणे, मजूरीवर जाणे, शिकार करणे, मांसे मारणे, इ.या अर्थप्राप्त करुन देणाऱ्या क्रीया करीत असतात.

आदिवासींमध्ये शिक्षण घेण्यामध्ये कमालीची उदासिनता दिसून येते. लोकांना शेती अथवा तत्सम पारंपारिक व्यवसाय करण्याकडे जास्त कल असतो. शिक्षण घेऊन फारसा फायदा होईल, असेत्यांना वाटत नाही.

१.८ आदिवासी क्षेत्रात सद्य स्थितीस तीन यंत्रणा प्राथमिक शिक्षण प्रसाराचे महान कार्य करतांना आढळतात.

१. जिल्हा परिषदांमार्फत शिक्षण
२. आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळांमार्फत शिक्षण
३. स्वयंसेवी शिक्षण संस्थामार्फत शिक्षण

वरीलपैकी जिल्हा परिषद शाळा व शासकीय आश्रमशाळा या दोन्ही शासनाच्या अधिपत्याखाली काम करतात. तर स्वयंसेवी संस्थांना काही अटींचे अधीन राहून शाळा चालविण्यासाठी शासनाकडून अनुदान देण्यात येते. वरील तीनही संस्थांकडून आदिवासी भागात शिक्षण प्रसाराचे कार्य केले जाते. तथापि, या शाळांचा शैक्षणिक दर्जा आदिवासी भागामध्ये अध्यापनाचे कार्य करीत असताना शिक्षक व व्यवस्थापनास येणाऱ्या अडचणी यांची मिमांसा करणे व त्यावर उपाय सुचविणे हे क्रमप्राप्त ठरते. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जिल्हा परिषदांच्या शाळा व शासकीय आश्रमशाळांमधील अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांची इयत्तावर विद्यार्थी संख्या पाहणे संयुक्तिक होईल.

तक्ता क्र.१.१

महाराष्ट्रातील उपयोजना क्षेत्रातील जिल्हा परिषदांच्या शाळांमधील व शासकीय आश्रमशाळांमधील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची इयत्तावार विद्यार्थी संख्या दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थी संख्या (१९९३-९४) | | | | | शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी संख्या (१९९५-९६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | इयत्ता | मुले | मुली | एकूण | दाखल झालेल्या विद्यार्थ्यांशी टिकून राहिलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण | इयत्ता | मुले | मुली | एकूण | १ ली शी तुलना करता टिकून राहिलेले विद्यार्थी -टक्केवारी |
| १. | १ ली | ६८८६५ | ५८३५३ | १२७२१८ | - | १ ली | ११९०० | ६८७२ | १८७७२ | - |
| २. | २ री | ५३५१८ | ४३४२७ | ९६९४५ | ७६.२० | २ री | १०९५३ | ६३१८ | १७२७१ | ९२ |
| ३. | ३ री | ४५९४८ | ३६५२१ | ८२४६९ | ८५.०६ | ३ री | ११८६७ | ६३२६ | १८१९३ | ९६.९१ |
| ४. | ४ थी | ३४४८४ | २५८४९ | ६०३३३ | ७३.१५ | ४ थी | ११०११ | ६६१५ | १७६२६ | ९३.८९ |
| ५. | ५ वी | २६९७१ | १६४५९ | ४३४३० | ७१.९८ | ५ वी | १३३०० | ७५७० | २०८७० | १११.१७ |
| ६. | ६ वी | २१५२७ | १२५३४ | ३४०६१ | ७८.४२ | ६ वी | ११६५९ | ६९७२ | १८६३१ | ९९.२४ |
| ७. | ७ वी | १८१०२ | ०९९३१ | २८०३३ | ८२.३० | ७ वी | ११३५९ | ५८५५ | १७२१४ | ९१.७० |
| ८. | ८ वी | १४६०१ | ६१८६ | २०७८७ | ७४.१५ | ८ वी | ६०७० | २६१५ | ८६८५ | ४६.२६ |
| ९. | ९ वी | १२३६३ | ४८०१ | १७१६४ | ८२.५७ | ९ वी | ५२५६ | २११८ | ७३७४ | ३९.२८ |
| १०. | १० वी | ०९१८२ | ३४२६ | १२६०८ | ७३.४५ | १० वी | ४५५३ | १९५६ | ६५०९ | ३४.६७ |
| एकूण | | ३०५५६१ | २१७४८७ | ५२३०४८ | | एकूण | ९७९२८ | ५३२१७ | १५११४५ | |
| टक्केवारी | | ५८.४२ | ४१.५८ | १००% | | टक्केवारी | ६४.८० | ३५.२० | १००% | |

संदर्भ- १. शिक्षणावर दृष्टीक्षेप- १९९३-९४ पान क्र.१५५

२. कार्यक्रम अंदाजपत्रक-१९९५-९६, पान क्र.३५

उपरोक्त तक्ता क्र.१.२ मध्ये उपयोजना क्षेत्रातील जिल्हा परिषदांच्या शाळां व शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या दर्शविण्यात आली. त्याबरोबरच इयत्ता १ ली मध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यांपैकी पुढील वर्गामध्ये टिकून राहिलेल्या विद्यार्थ्यांची टक्केवारी निर्देशित करण्यात आली आहे.

१. जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी संख्या

इ.सन.१९९३-९४ यावर्षी उपयोजना क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या शाळेत १२ लाख, सात हजार दोनशे अठरा विद्यार्थी दाखल झाले होते. पैकी इयत्ता २ री मध्येच जवळ जवळ २५ % विद्यार्थ्यांची गळती झाली. इयत्ता ३ री मध्ये विद्यार्थी संख्या वाढली असली तरी इयत्ता ५ वी पर्यंत ७१.९८% विद्यार्थी शाळेत टिकून होते. त्यानंतर थोड्याफार प्रमाणात विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेली आहे. इयत्ता १० वी मध्ये येईपर्यंत ७३.४५% विद्यार्थी शाळेमध्ये टिकून होते. महाराष्ट्रामध्ये सन १९९३-९४ यावर्षी एकूण ५२ लाख तीन हजार ४८ विद्यार्थी जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षण घेत असल्याचे दिसून येते. यापैकी ४१.५८% मुली व ५८.४२ % मुले असल्याचे वरील आकडेवारीवरुन समजते.

२. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी संख्या

महाराष्ट्रातील आश्रमशाळांनी शिक्षण क्षेत्रात फार मोठा नांवलौकीक मिळविला आहे. जिल्हा परिषदांच्या शाळांशी तुलना करता आश्रमशाळांमध्ये होणाऱ्या गळतीचे प्रमाण हे सुरवातीच्या वर्गामध्ये फार कमी आहे, हे उपरोक्त तक्त्यावरुन दिसून येते. इयत्ता ४ थी पर्यंत जवळ जवळ ९४% विद्यार्थी शाळेत टिकून आहेत. इयत्ता ४ थीपर्यंत मुले लहान असल्याने व आश्रमशाळा दूर असल्यास, बरेच आदिवासी पालक आपल्या पाल्यांना जिल्हा परिषदेच्या शाळांत दाखल करणेजास्त पसंत करतात. इयत्ता ५ वी मध्ये विद्यार्थी संख्येचे प्रमाण दाखल झालेल्या विद्यार्थ्यांपेक्षाही ११% वाढले आहे. (१११.१७) ही आकडेवारी असे निर्देशित करते की, आश्रमशाळेत प्रवेश मिळाल्यावर विद्यार्थ्यांना कपडे, जेवण, शैक्षणिक साहित्य, राहण्याची व्यवस्था इ.मोफत मिळत असल्याने बरेचशे आदिवासी लोक इ.४ थी नंतर आपल्या पाल्यांची नांवे जिल्हा परिषदेच्या शाळेतून काढून घेतात व त्यांना आश्रमशाळेत घालतात. त्यामुळे आश्रमशाळेतील इ.५ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची टक्केवारी एवढी वाढल्याचे दिसते. तसेच स्थगन होऊन गळालेले विद्यार्थी पास होऊन विद्यार्थ्यांच्या स्थगन व गळती होण्यास हळूहळू प्रारंभ होतो व इयत्ता ८ वी पर्यंत केवळ ४६.२६% विद्यार्थी शाळेत टिकून राहतात व इयत्ता १० वी मध्ये केवळ ३४.६७% विद्यार्थी शिक्षण घेण्यास इच्छुक असल्याचे आढळले.

आदिवासी विद्यार्थ्यांमधील ही गळती इ.७ वी च्या पुढील वर्गामध्ये जास्त आढळते.

यावरुन मुले, मुली काम करण्याच्या वयोगटात आल्यावर शिक्षण घेण्याचे सोडून पालकांना आर्थिक कारणांसाठी हातभार लावण्यासाठी शिक्षण सोडून देत असावेत, तसेच मुलींच्याबाबत लग्न व घरकाम यासाठी शिक्षण अर्धवट सोडून देत असावेत, असे अनुमान काढल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

# प्रकरण क्र.२

## मूल्यमापन अभ्यासाची पाश्र्वभूमी, उदिष्टये आणि सर्वेक्षण पध्दती

### पाश्र्वभूमी

२.१ आदिवासींना शिक्षणाचे महत्व हळू-हळू पटत चालले आहे. आदिवासींच्या शैक्षणिक विकास साधण्याच्या दृष्टीने 'आश्रमशाळा' ही योजना आज सर्वांना परिचित झाली आहे. डोंगराळ, आदिवासी भागात अशा शाळांची खास आवश्यकता आहे, हे स्पष्ट झाले आहे. गरीबी व पारंपारिक गैरसमज यामुळे मुला-मुलींना शाळेत पाठविण्यास आदिवासी पालक तयार नसतात. पण आश्रमशाळांच्या व्यवस्थेत मुलांची व मुलींची जेवणाची, वास्तव्याची, कपड्याची आणि आवश्यक त्या शालेय साहित्याची विनामूल्य सोय केली जात असल्याने आता मागासलेल्या भागातील मुलांना आश्रमशाळांमार्फत सुकरपणे शिक्षण घेता येणे शक्य झाले आहे. यामध्ये प्राचीन काळातील जी 'गुरुकूल' पध्दती होती, त्या पध्दतीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला आहे. या व्यतिरिक्त महाराष्ट्रात फार पूर्वीपासून जिल्हा परिषदांच्या शाळा आस्तित्वात आहेत. या दोन्ही प्रकारच्या शैक्षणिक माध्यमातून आदिवासींचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास घडवून आणणे हे शासनाचे महत्वाचे धोरण आहे.

वरील सर्व पाश्र्वभूमीवर आदिवासींच्या शैक्षणिक उन्नतीतून सर्वांगीण उन्नती करण्याच्या दृष्टीने उपरोक्त दोन्ही संस्थांची कार्ये त्यांच्या अडचणी जाणून घेणे व त्यावर उपाय योजना सुचविण्यासाठी प्रस्तुतचा मूल्यमापन अभ्यास अहवाल हाती घेण्यात आला आहे.

### २.२ अभ्यास विषय व त्याचे महत्व

१९९१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येपैकी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ८.०१% इतके आहे. त्यापैकी ९.२७% आदिवासी लोकसंख्या महाराष्ट्रात वास्तव्य करीत आहे. सहयाद्री, गोंडवन, सातपुडा विभागातील पर्वतराजीत राहणारा आदिवासी आदिवासी समाज जगरहाटीपासून दूर, निसर्गाच्या सानिध्यात स्वत:च्या च्रंदमोळी विश्वात रमगाण झाला आहे.

आधुनिक समाजात शिक्षण ही मूलभूत गरज वाटते. शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. म्हणून शिक्षणाने सामाजिक विषमता नष्ट होऊन न्याय व समता प्रस्थापित होईल, असे वाटते. म्हणून आदिवासींतील शिक्षणाचे प्रमाण वाढवून त्यांना सर्वसामान्य प्रवाहात आणण्यासाठी 'आश्रमशाळा' स्थापन करण्यात आल्या. या

व्यतिरिक्त आदिवासी क्षेत्रात जिल्हा परिषदेच्या शाळामार्फतही आदिवासी मुलांची शैक्षणिक प्रगती घडवून आणली जाते. या दोन्ही प्रकारच्या शाळांचा 'तौलनिक अभ्यास' करुन या संस्था करीत असलेल्या शैक्षणिक कार्यावर प्रकाशझोत टाकण्यासाठी १९९५-९६ या आर्थिक वर्षासाठी 'जिल्हा परिषदेच्या शाळा व शासकीय आश्रमशाळा यांच्या शैक्षणिक दर्जाचा तुलनात्मक अभ्यास' हाती घेण्याचे ठरविण्यात आले.

## २.३ मूल्यमापन अभ्यासाची उदिष्टये :-

हा मूल्यमापन अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी खालील उदिष्टये नजरेसमोर ठेवण्यात आली होती.

१. जिल्हा परिषदेच्या शाळा व आश्रमशाळा यामधील विद्यार्थ्यांच्या प्रवेश व गळतीच्या कारणांचा आणि प्रमाणाचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सुचविणे.

२. जिल्हा परिषदेच्या शाळेत व आश्रमशाळेत दाखल झालेल्या मुला-मुलींच्या टक्केवारीचे जातवार प्रमाण शोधून काढणे. विद्यार्थी - विद्यार्थींनीचे शाळेतील दाखलातीचे प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

३. जिल्हा परिषदेच्या शाळेतील व आश्रमशाळेतील सर्व इयत्तांचे (इ.१ ते ७ व इ.८ ते १०) वार्षिक परीक्षांचे निकालांचे प्रमाण शोधून काढणे व वार्षिक परीक्षांचे निकाल अधिक चांगले लागण्यासाठी उपाय योजना सुचविणे.

४. सध्या आस्तित्वात असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेच्या प्रवेश पध्दतीचा अभ्यास करणे व ती सुलभ करण्याचे दृष्टीने उपाययोजना सुचविणे.

५. जिल्हा परिषदेच्या शाळेतील व आश्रमशाळेतील अध्यापन पध्दतीचा अभ्यास करणे.

६. जिल्हा परिषदेच्या शाळा व आश्रमशाळा यांच्यातील शिक्षकांच्या पदांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

७. दोन्ही प्रकारच्या शाळांत आस्तितवात असलेल्या मूलभूत सोयींचा अभ्यास करुन त्रुटी शोधणे.

## २.४ तुलनात्मक अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी 'आश्रमशाळांची' व जिल्हा परिषदेच्या शाळांची निवड

शासकीय आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या शाळा यांच्या शैक्षणिक दर्जाचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी व या अभ्यासामधून येणारे निष्कर्ष सर्वकष स्वरुपाचे यावेत, यासाठी सह्याद्री विभागातील नाशिक, धुळे जिल्हयातील २० आश्रमशाळांचा अभ्यास करण्यात आला. तर गोंडवन विभागातील अमरावती जिल्हयातील ६ आश्रमशाळांचा अभ्यास करण्यात आला.

त्याबरोबरच सह्याद्री विभागातील नाशिक, धुळे व पुणे जिल्हयातील ८ जिल्हा परिषदेच्या शाळांचा अभ्यास करण्यात आला. तर गोंडवन विभागातील अमरावती, चंद्रपूर जिल्हयातील २ जिल्हा परिषदेच्या शाळांची तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी निवड करण्यात आली. सर्वसाधारणपणे एका जिल्हयातून कमीत कमी एक व जास्तीत जास्त ५ शाळांची निवड करण्यात आली. रस्त्यालगतच्या रस्त्यापासून थोड्याश्या आत व रस्त्यांपासून खूप आत असलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सह्याद्री व गोंडवन विभागातील शाळांचा यामध्ये समावेश आहे. शाळा निवडतांना दुर्गम व अति दुर्गम भागातील शाळा निवडीचा उद्देश सफल झाला आहे. यामागील उद्देश असा की, मूल्यमापन अहवालातील निष्कर्ष सर्वकष स्वरुपाचे असावेत. डोंगराळ भागातील सभोवतालच्या परिसराचा शिक्षणावर काय परिणाम होतो, हे स्पष्ट व्हावे, हा यामागील हेतू आहे.

शाळा निवडीचे विवरण पुढील तक्त्यात दिलेले आहे.

तक्ता क्र.२.४

सर्वेक्षणासाठी निवडलेल्या शासकीय आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या शाळा

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | शासकीय आश्रमशाळा | जिल्हा परिषदेच्या शाळा |
|---|---|---|---|---|
| १. | धुळे | नवापूर | दोंगसागळी | तारापूर |
| | | | नवागांव | कोळदे |
| | | | बंधारे | |
| | | | उडफळी | |
| | | तळोदे | बोरद | अमलाड |
| | | | अमोनी | मोड |
| | | | शिर्वे | |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | शासकीय आश्रमशाळा | जिल्हा परिषदेच्या शाळा |
|---|---|---|---|---|
| | | नंदूरबार | खोकराळे | |
| | | अक्राणी | मांडवी | |
| | | शहादा | राणीपूर | |
| २. | नाशिक | पेठ | ठाणापाडा | कुंभाळे |
| | | | खरपडी | |
| | | दिंडोरी | चिंचवड | राजबारी |
| | | | निगडोळ | |
| | | नाशिक | तोरंगण | खिरकिडे |
| | | इगतपूरी | वैतरणानगर | |
| | | | काळुस्ते | |
| | | कळवण | चणकापूर | |
| | | | नारुळ | |
| | | सुरगाणा | आंबूपाडा | |
| ३. | अमरावती | धारणी | सुसर्दा | साद्राबाडी |
| | | | टेंबळी | |
| | | चिखलदरा | जरिदा | |
| | | | डोमा | |
| | | वरुड | माणिकपूर | |
| | | | वाई खु. | |
| ४. | चंद्रपूर | चंद्रपूर | - | सिदूर |
| ५. | पुणे | आंबेगांव | - | बोरघर |
| एकूण | | | २६ | १० |

२.५ आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या शाळा यांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी पाहणीतील संदर्भ वर्ष :-

वरील दोन्ही प्रकारच्या शाळांच्या शैक्षणिक दर्जाच्या तौलनिक अभ्यास करण्यासाठी १९८६ हे संदर्भ वर्ष धरण्यात आले. त्यानुसार विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड मागविण्यात आले. याशिवाय इतर शैक्षणिक उपक्रम उदा.गटसंमेलने, क्रीडा स्पर्धा, लोकनृत्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विज्ञान स्पर्धा, स्कॉलरशीप परीक्षा, हिंदी

परीक्षा या बरोबरच शिक्षण विभागाचे तपासणी अधिकारी यांच्या भेटी व त्या भेटींचे अभिप्राय, शाळांची वार्षिक तपासणी इ.बाबींची माहिती मागविण्यात आली. त्याप्रमाणे सर्व माहितीच्या आधारे सर्वेक्षण करण्याचे निश्चित करण्यात आले.

## २.६ क्षेत्रीय कामकाज पाहणी

क्षेत्रीय कामकाज पाहणीसाठी प्रत्यक्ष आश्रमशाळांना तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांना भेटी देण्याचे निश्चित करण्यात आले. यासाठी नाशिक, पुणे हे जिल्हे निवडण्यात आले. तेथील ४ जिल्हा परिषदेच्या शाळा व ४ शासकीय आश्रमशाळा निवडण्यात आल्या व त्यांना भेटी देण्यात आल्या. नागपूर व गडचिरोली हे दोन जिल्हे क्षेत्रीय पाहणीसाठी निवडण्याची इच्छा असताना अपूऱ्या कर्मचारी वर्गामुळे तेथील क्षेत्रीय कामकाज हाती घेता आले नाही. क्षेत्रीय पाहणीसाठी आश्रमशाळा निवडतांना दुर्गम व अति दुर्गम भागही विचारात घेण्यात आले.

## २.७ पाहणीत भरावयाची पत्रे

क्षेत्रीय पाहणीमध्ये जिल्हा, तालुका, गांव स्तरावरील माहिती व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे अभिप्राय मुलाखतीद्वारे गोळा करण्यात आले. मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी व शिक्षण विभागाचे अधिकारी यांचे अभिप्राय जाणून घेण्यात आले. यासाठी दोन प्रकारची पत्रके तयार करुन त्यामध्ये माहिती गोळा केली आहे ती पत्रके खालीलप्रमाणे आहेत-

| | |
|---|---|
| प्रपत्र-१ | मुख्याध्यापकांनी भरावयाचे प्रपत्र |
| प्रपत्र-२ | शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी भरावयाचे प्रपत्र |

या व्यतिरिक्त जिल्हा परिषदेतील व शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकांच्या औपचारिक मुलाखती घेऊन मते आजमाविण्यात आली. परंतू यासाठी स्वतंत्र प्रश्नावली तयार करण्यात आली नव्हती.

प्रपत्र-१ सदर पत्रकात जिल्हा परिषदेच्या तसेच आश्रमशाळांचे मुख्याध्यापक यांचेकडून शाळेच्या अध्यापन पध्दती, परीक्षा पध्दती व त्यांच्या अडचणीविषयी इ.सर्व माहिती गोळा केली आहे.

प्रपत्र-२ शिक्षण विभागोच अधिकाऱ्यांकडून शाळांच्या दर्जाविषयीचे अभिप्राय या पत्रकात भरुन घेण्यात आले. तसेच शिक्षणामध्ये सुधारणा होण्यासाठी काय केले पाहिजे, याविषयींचे अभिप्रायही या पत्रकात भरुन घेण्यात आले आहे.

## प्रकरण क्र.३

# आश्रमशाळा व आठव्या पंचवार्षिक योजनेतील शैक्षणिक धोरण

### ३.१ प्रस्तावना

भारतीय घटनेतील कलम ४६ अन्वये समाजाच्या दुर्बल घटकाच्या आणि विशेषतः अनुसूचित जाती-जमाती यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक हितसंबंधाकडे विशेष लक्ष देऊन त्यांचा विकास करण्याकरिता आणि त्यांना सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारचे शोषण यापासून संरक्षण देण्यास शासन कटिबध्द आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रात महाराष्ट्रातील १४ जिल्हयातील ६८ तालुक्यामधील ६९७५ गावांचा समावेश आहे. त्यांना उपयोजनेअंतर्गत असलेल्या सर्व योजनांचे फायदे दिले जातात. त्याशिवाय ज्या गांव समूहातील ५० टक्क्याहून अधिक आदिवासी लोकसंख्या आहे, अशा गांव समूहातील आदिवासींचा विकास करण्याच्या दृष्टीने सुधारीत क्षेत्र विकास खंड (MADA) व लघु सुधारित क्षेत्र विकास खंड (Mini MADA) केंद्र शासनाच्या संमतीने मंजूर करण्यात येऊन त्यांनाही उपयोजनेचे फायदे दिले जातात.

### ३.२ सामान्य शिक्षण

देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रीयेमध्ये 'शिक्षण' हे महत्वाची भूमिका पार पाडत असते. मनुष्यबळ निर्माण करण्यामध्ये 'शिक्षण' हे प्रमुख साधन आहे. प्रशिक्षित व सक्षम मनुष्यबळ तयार झाल्याशिवाय विकासाच्या योजना कार्यान्वित करणे शक्य नाही. भारत सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार ६ ते १४ वयोगटातील मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणांवर आणि निरक्षरता दूर करण्यावर भर देण्यात आला आहे.

### ३.३ आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळा

आश्रमशाळांची मूलभूत योजना :-

महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग तर्फे शासन निर्णय क्र.बीसीपी-१०७२/१३८९३, जी, दिनांक १४.८.१९७२ नुसार आश्रमशाळा समूहांची योजना मंजूर करण्यात आली.

## ३.४ शासकीय आश्रमशाळा

आश्रमशाळा ही एक निवासी शाळा असून तीमध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची जेवणाची, राहण्याची व शिक्षणाची मोफत सोय शासनामार्फत करण्यात येते. नवीन आश्रमशाळा उघडतांना प्रथमत १२० विद्यार्थ्यांची सोय वसतिगृहात केली जाते. काही बाहेरील विद्यार्थ्यांना देखील आश्रमशाळेत प्रवेश दिला जातो. त्यांना 'डे-स्कॉलर' असे म्हणतात. डे-स्कॉलर विद्यार्थ्यांना शासनामार्फत एक गणवेष, वह्या,पुस्तके, पाटी, अंथरुण, पांघरुण व शिक्षण इ.मोफत दिले जाते. प्राथमिक आश्रमशाळामधून इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंत शिक्षणाची सोय करण्यात येते. सातवी नंतरच्या शिक्षणासाठी आवश्यक ठिकाणी प्राथमिक आश्रमशाळेचे माध्यमिक शाळेत त्यांचे रुपांतर केले जाते. साधारणत: ५००० ते ७००० लोकवस्तीचा परिसर एका आश्रमशाळेच्या कक्षात येतो.

राज्यात सध्या एकूण ४०९ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून त्यापैकी आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये ३२० व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर ८९ शाळा आहेत. पोस्टबेसिक आश्रमशाळा २२३ आहेत. या शासकीय आश्रमशाळेमध्ये एकूण १,१८,७८३ विद्यार्थी असून मुलांची एकूण संख्या ७६,९०८ व मुलींची संख्या ४१,६७५ इतकी आहे. १९९३-९४ या वर्षी शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळेच्या शालांत परीक्षेचा निकाल ५५.२३% लागला आहे. या पार्श्वभूमीवर शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे यश निश्चित स्पृहणीय आहे. या संदर्भात इयत्ता १० वी च्या परीक्षेस बसलेले विद्यार्थी व पास झालेले विद्यार्थी यांचे प्रमाण पाहणे उचित ठरेल व ते खालील तक्त्यात दिलेले आहे.

तक्ता क्र. ३.४

जिल्हा परिषदेच्या शाळा व आश्रमखशाळांच्या शालांत परीक्षेच्या निकालाच्या टक्केवारीनुसार वर्गीकरण

| अ. क्र. | वर्ष | आश्रमशाळेतील परीक्षेस बसलेले व उत्तीर्ण विद्यार्थी संख्या व टक्केवारी | | | | | | जिल्हा परिषद शाळेतील परीक्षेस बसलेले व उत्तीर्ण विद्यार्थी संख्या व टक्केवारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शालांत परीक्षेस बसलेले विद्यार्थी संख्या व टक्केवारी | | | शालांत परीक्षेस उत्तीर्ण विद्यार्थी संख्या व टक्केवारी | | | शालांत परीक्षेस बसलेले विद्यार्थी संख्या व टक्केवारी | | | शालांत परीक्षेस उत्तीर्ण विद्यार्थी संख्या व टक्केवारी | | |
| | | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. |
| १. | १९९३-९४ | ४०८८ | ३१०१ | ९८७ | २२५८ | १७०३ | ५५५ | १२९७८५९ | उ.नाही. | उ.नाही. | ६५१३७९ | उ.नाही. | उ.नाही. |
| | | | (७५.८६) | (२४.१४) | (५५.२३) | (५४.९१) | (५६.२३) | | | | (५०.१९) | | |
| २. | १९९४-९५ | ४२९२ | ३००४ | १२८८ | २३७० | १६५९ | ७११ | | उ.नाही. | उ.नाही. | | उ.नाही. | उ.नाही. |
| | | | (७०.००) | (३०.००) | (५५.२१) | (५५.२२) | (५५.२०) | | | | | | |
| ३. | १९९५-९६ | ४५०६ | ३१५४ | १३५२ | २४८८ | १७४२ | ७४६ | | उ.नाही. | उ.नाही. | | उ.नाही. | उ.नाही. |
| | (अंदाजित) | | (७०.००) | (३०.००) | (५५.२१) | (५५.२३) | (५५.१७) | | | | | | |

उपरोक्त तक्त्यामध्ये १९९३-९४ ते १९९५-९६ या तीन वर्षाच्या काळात शालांत परीक्षेला बसलेले व परीक्षेत पास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या दर्शविण्यात आलेली आहे. आश्रमशाळेत १९९३-९४ पासून इ.१० वी च्या परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हळूहळू वाढत असल्याचे दिसते. आश्रमशाळेत इ.१० वी च्या परीक्षेस बसणाऱ्या मुलींचे प्रमाण हे तुलनेने मुलांपेक्षा कमी असून ते सर्वसाधारणपणे २५ ते ३० टक्क्यापर्यंत असल्याचे दिसते.

शासकीय आश्रमशाळेतून परीक्षेस बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी सरासरी ५५.२१% विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होत असल्याचे वरील तीन वर्षाच्या आकडेवारीवरुन दिसून येते.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये महाराष्ट्रात १९९३-९४ यावर्षी एकूण १२९७५९ विद्यार्थी शालांत परीक्षेस बसले होते. ही संख्या सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांची असल्याने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या दर्शविली नाही. पैकी ६५१३७९ (५०.१९%) विद्यार्थी परीक्षा उत्तीर्ण झाले. यावरुन आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे शालांत परीक्षा उत्तीर्ण होण्याची टक्केवारी जिल्हा परिषदेशी तुलनेने जास्त असल्याचे दिसून येते. यावरुन शासकीय आश्रमशाळांचा शैक्षणिक दर्जा तुलनात्मकदृष्टयाचांगला असल्याचे म्हणता येईल.

उपरोक्त तक्त्यावरुन एक बाब नमूद करावीशी वाटते की, मुलींचे शिक्षणाचे प्रमाण अद्यापही फारसे वाढले नाही. दाखल झालेल्या एकूण मुलींच्या तुलनेत इ.१० वी पर्यंत येणाऱ्या मुलांचे प्रमाण तुलनेने अत्यंत कमी असल्याचे दिसून येते. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे यश हे निश्चित स्पृहणीय आहे. या संदर्भात इ.१० वी च्या परीक्षेस बसलेले विद्यार्थी व पास झालेले विद्यार्थी यांचे प्रमाण पाहणे उचित ठरेल. ते खालील तक्त्यात दिलेले आहे.

## ३.५ अनुदानित आश्रमशाळा

आदिवासींचा शैक्षणिकदृष्टया विकास करण्याच्या दृष्टीकोनातून स्वेच्छा संस्थामार्फत अनुदानित तत्वावर आश्रमशाळा सुरु करण्याची योजना सन १९५३-५४ सालापासून कार्यरत आहे. १९७२-७३ या वर्षापासून शासनामार्फत आश्रमशाळा उघडण्याचे सुरु केल्यामुळे मध्यंतरी स्वेच्छा संस्थांना अनुदानित तत्वावर आश्रमशाळा सुरु करण्याची परवानगी देण्याचे बंद करण्यात आले होते. तथापि, शासनाने सन १९८६-८७ या वर्षापासून या योजनेचा फेरविचार करुन स्वेच्छा संस्थांना अनुदानित तत्वावर आश्रमशाळा ज्या ठिकाणी शासन उघडू शकत नाही, अशा दुर्गम भागात जर एखादी लौकीकपात्र संस्था आश्रमशाळा चालविण्यास पुढे आली तर तिला आश्रमशाळा चालविण्यास मंजूरी देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने सन १९८६-८७ या वर्षापासून पुन्हा आश्रमशाळांना स्वयंसेवी ~~संस्थेमार्फत~~ चालविण्यास अनुमती देण्यात आली आहे. डिसेंबर, १९९४ अखेर राज्यात एकूण ३११ अनुदानित आश्रमशाळा मंजूर करण्यात आल्या असून त्यापैकी ९१ आश्रमशाळा या पोस्टबेसिक आश्रमशाळा आहेत. या आश्रमशाळेमध्ये एकूण ७० हजार आदिवासी विद्यार्थी आहेत.

## आदिवासी उपयोजना फंडातून (**TSP Funds**) राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक योजना

आदिवासी क्षेत्रामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत ज्या महत्वाच्या योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे-

१. बालवाड्या सुरु करणे

२. शाळा नसलेल्या गांवामध्ये प्राथमिक शाळा सुरु करणे :- डोंगराळ व दुर्गम क्षेत्रामध्ये विशेषत: आदिवासी क्षेत्रामध्ये शिक्षणाच्या सुविधा नाहीत म्हणून १०० एवढी लोकवस्ती असलेल्या व १ कि.मी.अंतरावर जेथे शिक्षणाची सोय उपलब्ध नाही. अशा गांवामध्ये प्राथमिक शाळा सुरु करण्याची प्रमाणके शिथिल केली आहेत.

३. स्वाभाविक वाढीमुळे प्राथमिक शाळा शिक्षकांची नेमणूक :- विद्यमान प्रमाणकानुसार ४० विद्यार्थ्यांची नांवनोंदणी असलेल्या प्राथमिक शाळेसाठी एक शिक्षक ४१ ते ८० विद्यार्थ्यांसाठी २ शिक्षक आणि ८१ ते १२० एवढी नांव नोंदणी असलेल्या शाळेसाठी ३ शिक्षक मंजूर केले जातात.

४. प्राथमिक शाळांमधील पुस्तक पेढ्या

५. इयत्ता १ ली ते ४ थी शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विशेष सुविधा, गणवेष व लेखनसामग्री पुरविणे.

६. प्राथमिक शाळा इमारतींचे बांधकाम करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास प्राधिकरणास अनुदान

७. समाजाच्या दुर्बल घटकांतील मुलींना उपस्थिती भत्ता :- विद्यार्थिनीमधील गळतीचे प्रमाण मागासवर्गीय समाजात अधिक आहे. हे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि सामाजिक न्याय देण्यासाठी समाजातील अनुसूचित जाती/जमाती व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या मुलींना उपस्थिती भत्त्याच्या स्वरुपात प्रोत्साहन रक्कमेची तरतूद केलेली आहे. या रक्कमेखाली मुलींच्या पालकांना एका शैक्षणिक वर्षातील २२० कामांच्या दिवसांसाठी दर दिवशी रु.१/- याप्रमाणे उपस्थिती भत्ता देण्यात येतो. तथापि, या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र होण्यासाठी ग्रामीण क्षेत्राकरिता उत्पन्नाची मर्यादा दरसाल रु.१०,०००/- आणि नागरी क्षेत्राकरिता रु.११,८५०/- एवढी निश्चित करण्यात आली आहे.

## माध्यमिक शिक्षण

१. नवीन अशासकीय माध्यमिक शाळा सुरु करणे

२. माध्यमिक शाळांचा विकास-जादा तुकड्या सुरु करणे

३. माध्यमिक शाळांमधील पुस्तक पेढी

४. केळापूर पध्दतीने शासकीय विद्यानिकेतनाचा विकास

५. उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास (जादा तुकडी)

६. इयत्ता १ ली व २ री मध्ये शिकणाऱ्या आदिवासी मुलांसाठी शिक्षणोपयोगी साहित्य तयार करणे

७. आदिवासी क्षेत्रात शिकविण्यात येणाऱ्या इंग्रजी,विज्ञान, गणित या विषयांसाठी गुणात्मक सुधारणा करणे.

८. इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिकत असणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन देणे :- इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिकत असणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी त्यांना पुढील दराने विद्यावेतन देण्यात येते.

| | इयत्ता ५ वी ते ७ वी | इयत्ता ८ वी ते १० वी |
|---|---|---|
| मुले | रु. ४०/- दरमहा | रु.५०/- दरमहा |
| मुली | रु.५०/ - दरमहा | रु.६०/- दरमहा |

## आठवी पंचवार्षिक योजना

महाराष्ट्रात आठव्या पंचवार्षिक योजनेत शिक्षणाच्या खालील बाबींवर भर देण्यात आला आहे.

१. मुख्यत्वे करुन आदिवासी उपयोजना क्षेत्र,डोंगरी, दुर्गम क्षेत्र आणि इतर मागासलेल्या क्षेत्रांमध्ये वेगाने प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहणे.

२. दुर्बल घटकातील समाजाला उद्युक्त करण्याच्या दृष्टीने विशेष कृती योजना कार्यान्वित करुन, त्याद्वारे प्राथमिक शिक्षण स्तरावरील गळतीचे प्रमाण कमी होण्यासाठी प्रयत्न करणे.

३. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराच्या प्रक्रीयेमध्ये ग्रामीण व मागास क्षेत्रातील स्थानिक संस्थांना सहभागी करुन घेऊन त्याद्वारे ग्रामीण भागामध्ये शिक्षणाला पोषक असे वातावरण तयार करणे.

४. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व मागासलेल्या घटकाला त्यांच्या मुलांना धावयाच्या प्राथमिक शिक्षणाचे महत्व लक्षात आणून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे. यासाठी शिक्षक संघटना, सेवाभावी संघटना व शासनामार्फत संघटक नेमून आणि रोटरी क्लब व लायन्स क्लब सारख्या अशासकीय संस्थांची मदत घेणे. असे कल्याने निरक्षरांमध्ये शिक्षणाचे महत्व जाणून घेण्याच्या दृष्टीने जागृती निर्माण करण्यास मदत होईल.

५. मागासवर्गीय कुटुंबातील मुलांना प्राथमिक शाळेत जाण्यास प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने त्यांचा आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी उपाययोजना करणे.

६. आदिवासी उपयोजना आणि मागास क्षेत्रात प्रौढ शिक्षण कार्यक्रमाची गती वाढविण्याच्या दृष्टीने जागृती निर्माण करण्यासाठी शिबिरे आयोजित करणे.

७. डोंगरी व दुर्गम खेड्यातून सध्याचे नियम शिथिल करुन जादा प्राथमिक शाळा उघडावयाच्या असून त्यासाठी आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये रु.१५१.०० लाखाची तरतूद केली आहे.

८. आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये १९,२०० प्राथमिक शिक्षकांच्या नेमणूका टप्प्याटप्याने करण्यासाठी रु.१३,३०५.०० लाखाची तरतूद केलेली आहे.

९. आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये एक शिक्षकी शाळांना जोडून २२,५०० बालवाड्या टप्प्याटप्याने उघडावयाच्या असून त्यासाठी १८३०.५६ लाख रुपयाची तरतूद आहे.

१०. प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या मुलांना विशेष सुविधा :- सर्व साधारणपणे असे निदर्शनास येते की, अनुसूचित जाती-जमातीमधील विद्यार्थी शिक्षणात मागे राहिलेले आहेत. त्यांना प्राथमिक शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे, म्हणून प्रति विद्यार्थी गणवेषाची जोडी आणि लेखनसाहित्य दिले जाते. त्यामुळे इ.१ ली ते ४ थी मधील मुलांच्या उपस्थितीमधील गळतीचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. सदर योजना ज्या क्षेत्रामध्ये साक्षरतेचे प्रमाण १० टक्के पेक्षा कमी आहे, तेथे ६ ते ११ वयोगटातील पटनोंदणी ७५% पेक्षा कमी आहे, तेथे राबविली जाते. ८ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये वरील योजनेत गरजू विद्यार्थ्यांना सामावून घेण्यासाठी १०६२५०० रुपयाची तरतूद केली आहे.

## ३.७ सामाजिक व सामूहिक सेवा :-

या योजनेअंतर्गत खालील शैक्षणिक योजनांचा समावेश होतो.

१. प्राथमिक शाळेत पुस्तकपेढ्या उघडणे :- या योजनेअंतर्गत प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या इयत्ता १ ली ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तके पुरविली जातात. सदरची पुस्तके बालभारती, पुणे यांचेकडून पुरविली जातात. इयत्ता १ ली, २ री, ६ वी व ७ वी साठी पुस्तके खरेदी करण्याकरिता तरतूद प्रस्तावित केलेली आहे. मुलांना शाळेत येण्यास प्रोत्साहन म्हणून गळतीचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.

२. शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या भागातील अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती पुरविणे :- आदिवासी भागातील प्राथमिक शाळांच्या इ.१ ली ते ४ थी मधील विद्यार्थ्यांची गळती व हजेरीतील अनियमितपणा कमी करुन नियमित उपस्थिती वाढविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे, म्हणून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेषाचे संच व लेखनसाहित्य पुरविले जाते. गणवेषाचे प्रत्येक संचात मुलासाठी एक अर्धी चड्डी, सदरा व मुलींसाठी फ्रॉक यांचा समावेश असतो. ज्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील साक्षरतेचे प्रमाण १० टक्के पेक्षा कमी आहे व शाळेतील पटसंख्या ७० टक्केपेक्षा कमी आहे, अशा शाळेतील ६ ते ११ वयोगटातील पात्र आदिवासी विद्यार्थ्यांना लेखनसाहित्य पुरविले जाते. प्रत्येक विद्यार्थ्यास गणवेषासाठी रु.६०/- व लेखन साहित्यासाठी रु.१०/- या प्रमाणे खर्च प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

३. आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन :- आदिवासी विद्यार्थी/विद्यार्थीनींना शाळेत न येण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांची गरीबी हे होय, हे सर्वश्रुत आहे. त्यांना जरी मोफत पाट्या, पुस्तके, गणवेष इ.पुरविण्यात आले तरी पण ते शाळेत येत नाहीत. म्हणून त्यांना अधिक प्रोत्साहन देण्याकरिता विद्यावेतन देण्याची योजना राबविण्यात येत आहे.

४. माध्यमिक शाळांतून पुस्तकपेढ्या उघडणे :- या योजनेअंतर्गत माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना एकूण पटसंख्येचया २५ टक्के इतक्या प्रमाणात अनु.जाती/जमाती/विमुक्त भटक्या जाती/जमातींच्या विद्यार्थ्यांना क्रमिक पाठ्यपुस्तके पुरविणे.

५. आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती :- या योजनेअंतर्गत अनुदान तत्वावरील उच्च माध्यमिक विद्यालयातील आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना सदर सवलतीचा लाभ दिलेला आहे. या सवलतींमध्ये सत्र फी, प्रवेश फी, शिक्षण फी इ.चा समावेश आहे.

६. इ.१२ वी पर्यंतच्या मुलींना मोफत शिक्षण :- इयत्ता १२ वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण योजनेखाली विहित केलेल्या अटींस अधीन राहून शैक्षणिक सवजतींचा लाभ देण्यात येतो. यात शिक्षण फी सवलत व प्रवेश फी, यांचा अंतर्भाव असतो.

७. दुर्बल घटकातील मुलींना शाळेत नियमित येण्यासाठी उपस्थिती भत्ता :- दारिद्र्य रेषेखालील कमी उत्पन्नाच्या गटातील इ.१ली ते ४ थी पर्यंत शाळेत जाणाऱ्या मुलींचे प्रमाण कमी आहे. पटनोंदणी वाढविण्याच्या उद्देशाने मुलींना प्रतिदिनी १ रुपया उपस्थिती भत्ता शासनाच्या नियमानुसार देण्यात येतो. एकूण २२० दिवस उपस्थित राहिल्यास एका मुलीस रु.२२०/- रुपये खर्च येतो.

८. जनशिक्षण निलयम केंद्राचे प्रबलीकरण :- नवसाक्षरांनी आत्मसात केलेली साक्षरतेची कौशल्ये कायम स्वरुपात टिकवून ती वृध्दींगत व्हावीत, म्हणून जनशिक्षण निलयम केंद्र स्थापन करण्यात आली आहेत. सदरील नवसाक्षरांना मनोरंजन व खेळ या बरोबरच कार्यात्मकता साधावी, म्हणून जनशिक्षण निलायम केंद्रांना १९९१-९२ मध्ये विविध प्रकारची मदत देण्यात आली. उदा.शिवण मशीन पुरविणे. ही केंद्रे चालू ठेवण्यासाठी प्रत्येक केंद्रावर एक प्रशिक्षित संघटिका किंवा संघटक नेमण्यात येत असून त्यावरील खर्च सुध्दा या योजनेमधून करण्यात येतो. शिक्षक संघटिका/संघटकास दरमा रु.१००/- इतके मानधन देण्यात येत.

## ३.८ आठव्या पंचवार्षिक योजनेतील अंदाजपत्रकातील तरतूद :-

सर्वसामान्यांच्या शिक्षणासाठी 'सामाजिक सेवा' या शीर्षांतर्गत 'शिक्षणावर' अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आली आहे. तसेच 'आदिवासी विकास विभागांतर्गत' आदिवासींच्या शिक्षणावर स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. खालील तक्त्यामध्ये शिक्षणासाठी आठव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत करण्यात आलेली तरतूद व सन १९९२-९३ साली त्यावर झालेला प्रत्यक्ष खर्च दर्शविण्यात आलेला आहे.

तक्ता क्र.२

आठव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत राज्य व उपयोजना क्षेत्रांतर्गत सामान्य शिक्षणावरील तरतूद व खर्च

(रुपये लाखांत)

| अ. क्र. | राज्यासाठी एकूण तरतूद | उपयोजना क्षेत्रासाठी एकूण तरतूद | सामान्य शिक्षणावरील तरतूद | आदिवासी विभागांतर्गत सामान्य शिक्षणावरील तरतूद | १९९२-९३ चा सामान्य शिक्षणावरील खर्च | १९९२-९३ सालात आदिवासी विकास विभागांतर्गत सामान्य शिक्षणावरील प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १. | १८५२००० | ११५९१७ | ७३०-०० | १३८.०० | ८७.०३ | १३५.५८ |
| | | ६.२७% | ०.३९ | - | ०.१२ | ०.९८ |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आठव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत राज्यात सर्व योजनांसाठी १८,५२,०००/- लाख एवढी तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी शिक्षण विभागांतर्गत सामान्य शिक्षणासाठी रु.७३०.०७ लाख एवढी तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी १९९२-९३ यावर्षी ०.१२ टक्के रक्कम प्रत्यक्ष खर्च झाली.

आदिवासी उपयोजनेअंतर्गत शिक्षणावर किती खर्चाची तरतूद केली व प्रत्यक्ष किती खर्च झाले याचे विश्लेषण केले असता आदिवासी उपयोजनेअंतर्गत एकूण ११,५,९१७ लाख (६.२७%) राखून ठेवण्यात आले आहेत. सामान्य शिक्षणासाठी रु.१३८.०० लाख एवढी तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी १९९२-९३ यावर्षी ०.९८ टक्के इतकी रक्कम प्रत्यक्ष खर्च झार्ला आहे.

## प्रकरण क्र.४

# सर्वेक्षणात गोळा केलेल्या सांख्यिकी माहितीचे पृथ:करण

प्रस्तुत मूल्यमापन अहवालात पाहणीसाठी निवडलेल्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या शाळांचा तौलनिक अभ्यास केला आहे. राज्यातील वेगवेगळ्या पाच जिल्हयातील विविध शाळांतील महत्वाच्या मूलभूत सांख्यिकी व प्राथमिक माहितीच्या आधारे हा अहवाल तयार केला आहे.

क्षेत्रीय पाहणीमध्ये २६ शासकीय आश्रमशाळा व दहा जिल्हा परिषदेच्या शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन शाळेच्या इमारतींचा पुरतेपणा, शाळांमधील निकालाचे व गळतीचे प्रमाण, शाळेचा शैक्षणिक दर्जा, शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी असणाऱ्या सुविधा, वार्षिक नियोजन व घटक नियोजनाप्रमाणे अभ्यास घेतला जातो का ? दैंनदिन अध्यापन पध्दती व त्यातील परिणामकारक अध्यापन पध्दती, शाळेमध्ये राबविले जाणारे उपक्रम, शाळांची वार्षिक व मासिक तपासणी, शाळेचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेले मार्गदर्शन इत्यादीबाबत सविस्तर माहिती गोळा करण्यात आली. त्या सांख्यिकी माहितीचे पृथ:करण व तक्तीकरण करुन त्याचे विश्लेषण पुढील निरनिराळ्या तक्त्यात करण्यात आले आहे.

तक्ता क्र.४.१

इयत्तानिहाय शाळांची वर्गवारी

| अ. क्र. | जिल्हा | शासकीय आश्रमशाळा | | | जिल्हा परिषदेच्या शाळा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इ.१ ली ते ७ वी | इ.१ली ते १० वी | एकूण | इ.१ ली ते ७ वी | इ.१ली ते १० वी | एकूण |
| १. | नाशिक | ३ | ७ | १० | ३ | - | ३ |
| २. | धुळे | २ | ८ | १० | १ | ३ | ४ |
| ३. | अमरावती | ३ | ३ | ६ | - | १ | १ |
| ४. | पुणे | - | - | - | १ | - | १ |
| ५. | चंद्रपूर | - | - | - | - | १ | १ |
| एकूण | | ८ | १८ | २६ | ५ | ५ | १० |
| टक्केवारी | | ३०.७७ | ६९.२३ | १००% | ५०% | ५०% | १००% |

शासकीय आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शैक्षणिक दर्जाचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी नाशिक, धुळे, अमरावती, पुणे व चंद्रपूर या ५ जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या १० शाळांची व आदिवासी विकास विभागाच्या २६ आश्रमशाळांची निवड करण्यात आली होती.

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, पाहणीसाठी निवडलेल्या एकूण २६ आश्रमशाळांपैकी १८ आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना १ ली ते १० वी पर्यंत शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध झालेली आहे. जिल्हा परिषदेच्या एकूण १० शाळांपैकी निम्म्या शाळांमध्ये १ ली ते ७ वी पर्यंत शिक्षण घेण्याची सुविधा आहे, तर उरलेल्या ५ शाळांमध्ये १० वी पर्यंत शिक्षणाची सुविधा आहे. अमरावती जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या एका शाळेत १२ वी पर्यंत शिक्षण घेण्याची सोय जिल्हा परिषदेने उपलब्ध करुन दिली आहे, असे पाहणीत आढळून आले.

उपरोक्त आकडेवारीवरुन असे निदर्शनास येते की, आश्रमशाळांत इ.१ली ते १० वी पर्यंतचे वर्ग असणाऱ्या आश्रमशाळांचे प्रमाण ६९% आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेत हे प्रमाण ५०% इतके आहे. याचाच अर्थ असा की, माध्यमिक शिक्षणाच्या सुविधा शासकीय आश्रमशाळेत जास्त असून त्यामानाने जिल्हा परिषदेच्या शाळेत कमी प्रमाणात आहेत.

उपरोक्त तक्त्यावरुन असेही दिसून येते की, आदिवासी क्षेत्रात शासकीय आश्रमशाळांची संख्या जिल्हा परिषदेच्या तुलनेने जास्त असून माध्यमिक शिक्षणाच्या सुविधा पुरविण्यात आश्रमशाळा अग्रेसर असल्याचने या शाळांमधील विद्यार्थी संख्याही जास्त असल्याचे निदर्शनास येते.

तक्ता क्र.४.१
विद्यार्थ्यांचे जमातीनिहाय वर्गीकरण

| अ.क्र. | जिल्हा | विद्यार्थी संख्या | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शासकीय आश्रमशाळा | | | | | जिल्हा परिषदेच्या शाळा | | | | |
| | | अनु. जाती | इ.मा. वर्गीय | अनु. जमाती | अन्य | एकूण | अनु. जाती | इ.मा.व र्गीय | अनु. जमाती | अन्य | एकूण |
| १. | नाशिक | ३९२ | ४३ | ३२६८ | १०१ | ३८०४ | ३० | ४० | २५१ | ४१ | ३६२ |
| २. | धुळे | २० | ३१ | ३९०५ | ३१ | ३९८७ | ७ | - | ६१५ | ८७ | ७०९ |
| ३. | अमरावती | ६३६ | ९० | ७९६ | १ | १५२३ | ११० | ३३ | १८ | १ | १६२ |
| ४. | पुणे | - | - | - | - | - | २ | ३ | १३३ | २७ | १६५ |
| ५. | चंद्रपूर | - | - | - | - | - | नि | र | क | - | |
| एकूण | | १०४८ | १६४ | ७९६९ | १३३ | ९३१४ | १४९ | ७६ | १०१७ | १५६ | १३९८ |
| टक्केवारी | | ११.२५ | १.७६ | ८५.५५ | १.४४ | १०० | १०.६५ | ५.४४ | ७२.७५ | ११.१६ | १०० |

तक्ता क्र.४.२ मधील सांख्यिकी माहितीवरुन असे दिसून येते की, चंद्रपूर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळेनी विद्यार्थ्यांची संख्या नमूद केलेली नाही. उर्वरित चार जिल्हयांमधील माहितीचे विश्लेषण केले असता २६ शासकीय आश्रमशाळेत एकूण ९३१४ विद्यार्थी सध्या शिक्षण घेत असून यामध्ये ८५.५५ टक्के विद्यार्थी हे अनुसूचित जमातीचे आहेत. तर ११.२५ टक्के विद्यार्थी अनु.जातीचे आहेत. इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण अगदी अल्प आहे.

निवडलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्येही ७२.७५ टक्के विद्यार्थी केवळ अनुसूचित जमातीचे आहेत. उर्वरित विद्यार्थ्यांमध्ये (२७.२५%) अनुसूचित जाती, इतर मागास वर्गीय व अन्य जमातीच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

उपरोक्त आकडेवारीवरुन ज्य शाळा (जिल्हा परिषदेच्या शाळा व शासकीय आश्रमशाळा) आदिवासी क्षेत्रात आहेत, तेथे अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येते. आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक सोय झाल्याचेच हे द्योतक आहे.

आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या इमारती विद्यार्थ्यांना पुरेश्या आहेत का ? अपूरी असल्यास आणखी किती वर्गखोल्यांची आवश्यकता आहे ? शाळांना क्रीडांगण आहे का ? असल्यास शासकीय मालकीचे की भाड्याचे आहे ? इत्यादीबाबत माहिती पुढील तक्त्यात दिलेली आहे.

तक्ता क्र.४.३

शाळांचे गांवापासून अंतर, शालेय इमारतीचा प्रकार व शालेय इमारत विद्यार्थ्यांना पुरेशी आहे काय? यानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | जिल्हा | शाळा व त्यांची संख्या शासकीय आश्रमशाळा / जि.प.शाळा | शाळेचे गांवापासून अंतर (कि.मी.) | | | | | शालेय इमारतीचा प्रकार | | | | शालेय इमारत विद्यार्थ्यांना पुरेशी आहे का ? | | | | शाळेस क्रीडांगण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गांवात | १ ते ५ | ५ ते १० | १० ते १५ | १५ च्या पुढे | कच्ची | पक्की | भाड्याची | शासकीय मालकीची | होय | नाही | किती विद्यार्थ्यांना पुरते | आणखी किती खोल्यांची आवश्यकता आहे ? | होय | नाही | होय | नाही | होय | नाही |
| १ | नाशिक | शा.आ.शा.१० | २ | ८ | - | - | - | २ | ८ | - | १० | ७ | ३ | ७३० | १६ | ६ | ४ | ५ | ५ | ६ | ४ |
| २ | धुळे | शा.आ.शा.१० | ५ | ५ | - | - | - | ३ | ७ | १ | ९ | ४ | ६ | ११९८ | २७ | ७ | ३ | ६ | ४ | ७ | ३ |
| ३ | अमरावती | शा.आ.शा.६ | ६ | - | - | - | - | २ | ४ | - | ६ | ३ | ३ | १०१४ | १४ | ५ | १ | ४ | २ | ४ | २ |
| | एकूण | २६ | १३ | १३ | - | - | - | ७ | १९ | १ | २५ | १४ | १२ | २९३९ | ५७ | १८ | ८ | १५ | ११ | १७ | ९ |
| | टक्केवारी | १००% | ५० | ३९ | - | - | - | २६.९२ | ७३.०८ | ३.८४ | ९६.१६ | ५३.८५ | ४६.१५ | .... | ... - | ६९.२४ | ३०.७६ | ५७.५९ | ४२.३१ | ६५.३८ | ३४.६२ |
| १ | नाशिक | जिल्हा परिषद-३ | ३ | - | - | - | - | - | ३ | - | ३ | - | - | - | २ | ३ | - | १ | २ | २ | - |
| २ | धुळे | जिल्हा परिषद-४ | ३ | १ | - | - | - | - | ४ | - | ४ | नि | रं | क | ७ | २ | २ | २ | २ | २ | २ |
| ३ | अमरावती | जिल्हा परिषद-१ | १ | - | - | - | - | - | १ | - | १ | - | - | - | २ | १ | - | . | १ | - | १ |
| ४ | चंद्रपूर | जिल्हा परिषद-१ | १ | - | - | - | - | - | १ | - | १ | - | - | - | २ | - | १ | - | १ | - | १ |
| ५ | पुणे | जिल्हा परिषद-१ | १ | - | - | - | - | - | १ | - | १ | - | - | - | २ | - | १ | - | १- | १ | |
| | एकूण | १० | ९ | १ | - | | - | - | १० | - | १० | - | - | - | १५ | ६ | ४ | ३ | ७ | ४ | ५ |
| | टक्केवारी | (१०) | ९० | १० | - | - | - | | १० | | १० | - | - | - | १५ | ६० | ४० | ३० | ७० | ४० | ६० |

२१

उपरोक्त तक्ता क्र.४.३ वरुन

१. ५० टक्के आश्रमशाळा (१३) या गांवात असल्याचे पाहणीत आढळले तर ९० टक्के (९) जिल्हा परिषदेच्या शाळा या गांवात असल्याचे आढळले.

५० टक्के आश्रमशाळा या गांवापासून दूर साधारण १ ते ५ कि.मी. अंतराच्या परिसरात असल्याचे आढळले. उर्वरित ३ शाळां गांवापासून किती अंतरावर आहेत, याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही.

वरील आकडेवारीवरुन जिल्हा परिषदेच्या बहुतांश शाळा या गांवातच आहेत तर आश्रमशाळा या गांवापासून दूर व अति दुर्गम भागापर्यंत शिक्षणाचे जे कार्य करीत असल्याचे आढळले. याचा परिणाम म्हणजे खेडे गांवातील अति दुर्गम भागात शाळा पोहोचल्याने तेथील विद्यार्थ्यांची संख्याही वाढली आहे. पर्यायाने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आकडेवारी निश्चितपणे वाढली आहे.

२. आदिवासी विकास विभागाच्या ७३.०८% आश्रमशाळा पक्क्या इमारतीत भरतात, तर जिल्हा परिषदेच्या १०० टक्के शाळा शासकीय मालकीच्या पक्क्या इमारतीत भरत असल्याचे पाहणीत आढळले.

३. वरील शासकीय व भाड्याच्या शालेय इमारती विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पुरेशा आहेत का ? याची माहिती घेतली असता ५३.८५ आश्रमशाळांना शालेय इमारती पुरेशा आहेत. उर्वरित ४६.१५% आश्रमशाळांना ५७ खोल्यांची राहण्याची/वर्गाची व्यवस्था करण्याची गरज आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्येआणखी १५ खोल्यांची गरज असल्याचे निदर्शनास आले आहे.

४. शालेय विद्यार्थ्यांना शारिरीक व्यायामाच्या दृष्टीने 'क्रीडांगण' ही अत्यंत महत्वाची व आवश्यक बाब आहे. किती शाळांना क्रीडांगणे आहेत व ती पुरेशी आहे का, हे सर्वेक्षणामध्ये पाहिले असता फक्त ६९.२४% आश्रमशाळांना व ६० टक्के जिल्हा परिषदांच्या शाळांना क्रीडांगणे आहेत. उर्वरित जिल्हा परिषदांच्या दोन्ही प्रकारच्या शाळांना क्रीडांगणे नाहीत.

क्रीडांगण असले तरी ते विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी पुरेसे असतेच असे नाही. ५७.६९% आश्रमशाळाकडे पुरेसे क्रीडांगण आहे व ३० टक्के जिल्हा परिषद शाळांकडे पुरेसे क्रीडांगण आहे. ६५ टक्के आश्रमशाळांकडील क्रीडांगण हे शासकीय मालकीचे आहे तर केवळ ४० टक्के जिल्हा परिषद शाळांकडे शासकीय मालकीचे क्रीडांगण आहे. उर्वरित शाळांजवळील क्रीडांगण हे एक तर भाड्याचे अथवा शाळे लगतच्या मोकळ्या जागेचा वापर क्रीडांगण म्हणून केला जात असल्याचे निदर्शनास येते.

तक्ता क्र.४.४

प्रशिक्षित व अप्रशिक्षित शिक्षक संख्या, अध्यापन पध्दती व विद्यार्थ्यांना वरचे वर्गात घालण्याची पध्दतीनुसार शाळांचे वर्गीकरण

| अ.क्र. | जिल्हा | शाळांचा प्रकार व त्यांची संख्या | शिक्षक संख्या | | | | घटक नियोजन वा.नि.अभ्यास घेतला जातो का | | अध्यापन पध्दती | | | परिणामकारक अध्यापन पध्दती | | | विद्यार्थ्यांना वरच्या वर्गात घालण्याची पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्राथमिक | | माध्यमिक | | होय | नाही | | | | | | | | | |
| | | | प्रशिक्षित | अप्रशिक्षित | प्रशिक्षित | अप्रशिक्षित | | | व्याख्यान पध्दती | प्रश्नोत्तर पध्दती | चर्चा पध्दती | व्याख्यान पध्दती | प्रश्नोत्तर पध्दती | चर्चा पध्दती | क्षमता चाचणी | प्रथम, द्वितीय परीक्षा पध्दती | सत्राची सरासरी पध्दती |
| १ | नाशिक | शा.आ.शा.१० | ८२ | १२ | ३६ | - | १० | - | ७ | १० | ९ | १ | ७ | ६ | २ | ६ | २ |
| २ | धुळे | शा.आ.शा.१० | ७४ | २ | ४१ | २ | १० | - | ८ | १० | ७ | - | ८ | ४ | १ | ७ | ४ |
| ३ | अमरावती | शा.आ.शा.६ | ३५ | ३ | २४ | - | ६ | - | ४ | ३ | ६ | - | ३ | ३ | ३ | ३ | २ |
| | एकूण | २६ | १९१ | १७ | १०१ | २ | २६ | - | १९ | २३ | २२ | १ | १८ | १३ | ६ | १६ | ८ |
| | टक्केवारी | १००% | ९१८२% | ८१८% | ९८०५% | १९५% | १००% | - | ७३०८% | ८८४६% | ८४६१% | ३८४% | ६९२३% | ५०००% | २३०७% | ६१५३% | ३०७६% |
| १ | नाशिक | जिल्हा परिषद-३ | १० | १ | - | - | ३ | - | २ | ३ | ३ | १ | १ | १ | २ | २ | -- |
| २ | धुळे | जिल्हा परिषद-४ | २६ | - | - | - | ४ | - | १ | ४ | ४ | १ | ३ | २ | १ | ४ | - |
| ३ | अमरावती | जिल्हा परिषद-१ | ३ | - | ४ | १ | १ | - | १ | १ | १ | - | १ | - | - | १ | - |
| ४ | चंद्रपूर | जिल्हा परिषद-१ | २ | - | ३ | - | १ | - | १ | १ | - | १ | १ | - | - | १ | - |
| ५ | पुणे | जिल्हा परिषद-१ | ६ | - | - | - | १ | - | १ | १ | - | १ | १ | - | १ | १ | - |
| | एकूण | १० | ४७ | १ | ७ | १ | १० | - | ६ | १० | ८ | ४ | ७ | ३ | ४ | ९ | - |
| | टक्केवारी | १०० | १००% | १०% | ७०% | १०% | १००% | - | ६०% | १००% | ८०% | ४०% | ७०% | ३०% | ४०% | ९०% | ० |

१. पाहणीसाठी निवडलेल्या २६ शासकीय आश्रमशाळांमध्ये २०८ शिक्षक हे प्राथमिक विभागात तर १०३ शिक्षक माध्यमिक विभागात शिकवित असल्याचे दिसते. प्राथमिक आश्रमशाळेतील ९१.८२% शिक्षक. पोस्टबेसिक आश्रमशाळेत तर ९८.०५ % शिक्षक (माध्यमिक विभागात) प्रशिक्षित असल्याचे आढळले आले.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्येही जवळपास ९०% शिक्षक प्रशिक्षित असल्याचे आढळून आले.

२. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षकांची संख्या पुरेशी आहे काय ? हे पाहिले असता शासकीय आश्रमशाळामध्ये सरासरी ३० विद्यार्थ्यामागे १ शिक्षक तर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सरासरी २५ विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक असल्याचे दिसून येते.

वरील आकडेवारीवरुन ग्रामीण आदिवासी भागातही शिक्षकांची संख्या समाधानकारक असल्याचे दिसते. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये तर शिक्षकांचे प्रमाण जास्त असल्याचे वरील आकडेवारीवरुन दिसून येते.

३. शाळांमध्ये घटक नियोजन, वार्षिक नियोजनाप्रमाणे अभ्यास घेतला जातो का ? याची माहिती घेतली असता १००% शाळांनी नियोजनाप्रमाणे अभ्यास घेतला जात असल्याचे सांगितले. तथापि, जिल्हा परिषदेच्या शाळा व आश्रमशाळांना समक्ष भेटी दिल्या असता आश्रमशाळेमध्ये घटक नियोजनाप्रमाणे अभ्यास घेतला जात नसल्याचे आढळले. बहुसंख्य आश्रमशाळांमध्ये घटक नियोजन, वार्षिक नियोजन ठेवले जात नसल्याचे आढळले. याचे कारण जाणून घेतले असता जिल्हा परिषदेच्या शाळांना शिक्षण विभागाचे अधिकारी समक्ष भेटी देऊन शालेय कामकाजाची व अभ्यासक्रमाची माहिती घेतात, असे समजले. तथापि, शासकीय आश्रमशाळांना भेटी व तपासणी वरचेवर घेतली जात नसल्याने साहजिकच घटक नियोजन व वार्षिक नियोजनाप्रमाणे अभ्यास घेतला जातो किंवा नाही याकडे तपासणी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होते.

४. परिणामकारक अध्यापन पध्दतींची माहिती घेतली असता आश्रमशाळांमध्ये प्रश्नोत्तर पध्दती अधिक परिणामकारक असल्याचे निदर्शनास आले. ८८.४६% आश्रमशाळांमध्ये या पध्दतीचा वापर केला जात असल्याचे सर्वेक्षणात आढळले. त्याबरोबरच चर्चा पध्दतीही विद्यार्थ्यांच्या सहभागाच्या दृष्टीने उपयुक्त असल्याचे दिसते. ८४.६१% आश्रमशाळांमध्ये चर्चा पध्दतीने अध्यापन केले जात असल्याचे पाहणीत आढळून आले.

जिल्हा परिषदेच्या पाहणी केलेल्या शाळांना प्रश्नोत्तर पध्दती वापरली जाते व ८० टक्के शाळांमध्ये चर्चा पध्दतीनेही अध्यापन केले जाते.

५. वरील दोन्ही अध्यापन पध्दती प्रचलित असल्या तरी विद्यार्थ्यांना अध्ययन सुलभ होण्याच्या दृष्टीने प्रश्नोत्तर पध्दती ही पध्दती अधिक परिणामकारक असल्याचे संबंधितांकडून सांगण्यात आले.

६. विद्यार्थ्यांना वरचे वर्गात घालण्यासाठी शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रथम व द्वितीय परीक्षा पध्दतीचा अवलंब केला जातो. दोन्ही सत्रातील प्रगतीची सरासरी काढून विद्यार्थ्यांना वरचे वर्गात घालण्यात येते. या पध्दतीचा वापर सर्व आश्रमशाळांमध्ये केला जात असल्याचे निदर्शनास आले.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वरचे वर्गात घालण्यासाठी प्रथम व द्वितीय परीक्षा पध्दती बरोबरच क्षमता चाचणीचाही अवलंब केला जात असल्याचे जवळ जवळ सर्व शाळा प्रमुखांनी सांगितले.

शिक्षणाचा तुलनात्मक दर्जा दर्शविण्यासाठी वरील मुद्यांवर उहापोह केला असला तरी पुढील काही बाबींवरील आश्रमशाळांचा दर्जा जिल्हा परिषदांच्या शाळांच्या तुलनेत अधिक चांगला असल्याचे पाहणीत आढळून आले.

उदा.-

१. विद्यार्थ्यांना निवास व भोजन व्यवस्था मोफत असल्याने ९०% हजेरी व उपस्थितीचे जास्त प्रमाण आढळून येते व पर्यायाने अध्ययन चांगले होते व गळती कमी होते.

२. शिक्षक दूरवरचे असल्याने व निवासही आश्रमशाळेच्या परिसरातच असल्याने पूर्ण वेळ अध्यापनाकडे लक्ष देऊ शकतात.

३. हजेरीचे सातत्य नसल्याने जिल्हा परिषदांच्या शाळेच्या तुलनेत आश्रमशाळांचे परीक्ष निकाल चांगले लागतात.

४. आश्रमशाळेतील शिक्षकांच्या जागा फारश्या रिक्त राहत नाहीत.

शिक्षण विभागाचे अधिकारी आश्रमशाळा व जिल्हा परिषदांच्या शाळांना भेटी देतात काय ? भेटी देत असल्यास शाळांना मार्गदर्शन करुन शाळांची प्रतवारी केली जाते काय ? याची शाळांतून माहिती घेतली असता पुढील तक्त्याप्रमाणे निष्कर्ष हाती लागले.

तक्ता क्र.४.५

जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी सन १९९२ ते १९९४ साली शाळांना दिलेल्या भेटींचे वर्गीकरण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचा हुद्दा | जिल्हा परिषदेच्या एका शाळेस दिलेल्या सरासरी भेटी | एका आश्रमशाळेस दिलेल्या सरासरी भेटी |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा शिक्षण अधिकारी | १:१% | ०.६१% |
| २. | गट शिक्षण अधिकारी | २.७% | २.०७६% |
| ३. | शिक्षण विस्तार अधिकारी | १६.४% | ६.३४% |

शिक्षण विस्तार अधिकारी केवळ शैक्षणिक प्रशासनातीलच नव्हे तर एकूण शैक्षणिक प्रक्रीयेतील अत्यंत महत्वाचा घटक आहे. शैक्षणिक प्रगती ही जितकी शिक्षकांच्या गुणवत्तेवर अवलंबून आहे, तितकीच शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. ही कार्यक्षमता जिल्हा परिषदांच्या शाळा व आश्रमशाळांच्या बाबतीत कशी उपयोगात आणली जाते हे उपरोक्त तक्ता क्र.४.५ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

१. जिल्हा शिक्षण अधिकारी यांनी १९९२-९४ या तीन वर्षात जिल्हा परिषद शाळांना सरासरी १:१ व आश्रमशाळांना सरासरी ०.६१% भेटी दिल्याचे वरील आकडेवारीवरुन दिसून येते.

२. याच कालावधीत गट शिक्षण अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या एका शाळेस सरासरी २.७% व आश्रमशाळांना सरासरी २.०७६% भेटी दिल्याचे दिसून येते.

३. शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी निर्धारित कालावधीत एका जिल्हा परिषदेच्या शाळेस सरासरी १६.४% तर आश्रमशाळेस सरासरी ६.३४% भेटी दिल्याचे उपरोक्त तक्त्यावरुन दिसून येत इतर अधिकाऱ्यांच्या तुलनेत शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या शाळा भेटीचे प्रमाण जास्त असले तरी जिल्हा परिषदांच्या शाळांनाच ते जादा भेटी देतात, असे दिसून येते. यातून असे निष्पन्न होते की, विस्तार अधिकाऱ्यांनी जेवढ्या भेटी आश्रमशाळांना द्यावयास हव्यात तेवढ्या दिल्या जात नाहीत.

४. शिक्षण क्षेत्रामध्ये येऊ घातलेल्या नवनवीन शैक्षणिक पध्दतीचा शिक्षकांना परिचय करुन देणे, शैक्षणिक समस्यांवर विचार करुन वैचारिक देवाण-घेवाण माध्यमातून शैक्षणिक समस्या सोडविणे,इ.साठी वर्षातून १० वेळा (दर महिन्यास एक याप्रमाणे) गट संमेलनाचे आयोजन करावे, असे शिक्षण खात्याचे धोरण आहे.

तथापि, अशा गट संमेलनाला जिल्हा परिषदांच्या सर्वच्या सर्व शाळांना सातत्याने सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जाते. आश्रमशाळांचेबाबत २७% आश्रमशाळांना वर्षातून एकदा २७% आश्रमशाळांना शैक्षणिक वर्षातून तीनदा तर ३८.४६% आश्रमशाळांना ५ किंवा त्यापेक्षा अधिक वेळा गट संमेलनाना बोलाविण्यात येते.

येथे एक बाब नमूद करावीशी वाटते की, अशाप्रकारच्या संमेलन शिबिरांच्या मार्गदर्शनातूनही आश्रमशाळा शिक्षकांना शैक्षणिक समस्या सोडविण्यास मदत होईल, पण त्याही बाबतीत आश्रमशाळांना न्याय मिळत नाही, असे वाटते.

तक्ता क्र.४.६

शाळांतील बक्षिसे व प्रश्नपत्रिका

| अ.क्र. | जिल्हा | शाळांचा प्रकार व त्यांची संख्या | बक्षिसाच्या स्वरुपानुसार शाळांचे वर्गीकरण | | | प्रश्नपत्रिका कोण काढतात/त्यानुसार शाळांचे वर्गीकरण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वस्तु | रक्कम | प्रशस्तीपत्रक | प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून | शिक्षका/ मुख्याध्यापक | शिक्षक संघ/समिती | परीक्षा समिती/मंडळ | |
| १ | नाशिक | शा.आ.शा.१० | ३ | - | ६ | १० | - | - | - | |
| २ | धुळे | शा.आ.शा.१० | ४ | - | ६ | १० | - | - | - | |
| ३ | अमरावती | शा.आ.शा.६ | २ | - | २ | ६ | - | - | - | |
| | एकूण | २६ | ९ | - | १४ | २६ | - | - | - | |
| | टक्केवारी | १००% | ३४.६१% | - | ५३.८४ | १००% | - | - | - | जि.प.कडून |
| १ | नाशिक | जिल्हा परिषद-३ | २ | - | - | - | ३ | - | - | ४ |
| २ | धुळे | जिल्हा परिषद-४ | ४ | - | १ | - | - | - | - | |
| ३ | अमरावती | जिल्हा परिषद-१ | १ | - | १ | - | - | - | - | |
| ४ | चंद्रपूर | जिल्हा परिषद-१ | १ | - | - | . | . | . | १ | |
| ५ | पुणे | जिल्हा परिषद-१ | १ | - | - | | | . | १ | |
| | एकूण | १० | ९ | - | २ | - | - | - | ३ | ४ |
| | टक्केवारी | १०० | ९०% | - | २०% | - | ३० | - | ३०% | ४०% |

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यमापन करुन त्यांना वरचे वर्गात घालण्यासाठी जी परीक्षा घेतली जाते या परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका कोणाकडून पुरविल्या जातात, याची माहिती घेतली असता सर्व शासकीय आश्रमशाळांना प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून प्रश्नपत्रिका पुरविण्यात येतात, असे कळले. जिल्हा परिषदांच्या शाळांबाबत नाशिक जिल्हयातील ३०% शाळांचे शिक्षक/मुख्याध्यापक स्वत:च प्रश्नपत्रिका तयार करतात, असे निदर्शनास आले. चंद्रपूर, अमरावती, पुणे या जिल्हयातील शाळांना परीक्षा समिती अथवा परीक्षा मंडळाकडून प्रश्नपत्रिका संच पुरविले जातात. धुळे जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांना धुळे जिल्हा परिषदेकडून प्रश्नपत्रिका संच पुरविले जात असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले.

परीक्षेमध्ये चांगल्या गुणांनी पास होणाऱ्या अथवा विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे कशाप्रकारे कौतुक केले जाते, हे पाहिले असता ३४.८१% आश्रमवासी विद्यार्थ्यांना वस्तु स्वरुपात तर ५३.८४% आश्रमवासीय विद्यार्थ्यांना प्रशस्ती पत्रकाच्या स्वरुपात बक्षिसे दिले जात असल्याचे दिसून आहेत. जिल्हा परिषदेच्या ९०% शाळांमध्ये वस्तु स्वरुपात बक्षिसे देऊन विद्यार्थ्यांचा गुण गौरव केला जात असल्याचे आढळून आले.

तक्ता क्र.४.७

## आश्रमशाळा व जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गळतीची टक्केवारी

| अ.क्र. | जिल्हा | शाळांचा प्रकार व त्यांची संख्या | प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या गळतीचे शेकडा प्रमाण | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | इ.१ ली ते ४ थी | | | | इ.५ वी ते ७ वी | | | | इ.८ वी ते इ.१० वी | | | |
| | | | १ ते ५% पर्यंत | ६ ते १०% पर्यंत | ११ ते १५% पर्यंत | १६ ते २०% पर्यंत | १ ते ५% पर्यंत | ६ ते १०% पर्यंत | ११ ते १५% पर्यंत | १६ ते २०% पर्यंत | १ ते ५% पर्यंत | ६ ते १०% पर्यंत | ११ ते १५% पर्यंत | १६ ते २०% पर्यंत |
| १. | नाशिक | शा.आ.शा.१० | ६ | १ | २ | १ | ३ | ३ | २ | १ | २ | ३ | - | - |
| २. | धुळे | शा.आ.शा.१० | ५ | २ | १ | २ | ३ | ४ | | ९ | ३ | १ | - | - |
| ३. | अमरावती | शा.आ.शा.६ | - | १. | - | २ | २ | - | - | १ | - | १ | - | - |
| | एकूण | २६ | ११ | ५ | ३ | ५ | ८ | ७ | २ | ३ | ५ | ५ | - | - |
| | टक्केवारी | १००% | ४२.३० | १९.२३ | ११.५३ | १९.२३ | ३०.७६ | २६.९२ | ७.६९ | ११.५३ | १९.२३ | १९.२३ | - | - |
| १. | नाशिक | जिल्हा परिषद-३ | १ | १ | - | - | | - | - | - | - | | - | |
| २. | धुळे | जिल्हा परिषद-४ | २ | १ | - | - | २ | - | - | - | - | १ | - | |
| ३. | अमरावती | जिल्हा परिषद-१ | - | - | | | १ | | | | | | | |
| ४. | चंद्रपूर | जिल्हा परिषद-१ | | - | - | | १ | - | - | - | - | | - | |
| ५. | पुणे | जिल्हा परिषद-१ | १ | - | - | | | - | - | - | - | | - | |
| | एकूण | १० | ४ | 2 | | | ४ | | | | | [illegible] | | |
| | टक्केवारी | १०० | ४०% | २०% | - | - | ४०% | - | - | - | - | १०% | - | - |

प्रस्तुत मूल्यमापन अहवालाच्या क्षेत्रीय पाहणीमध्ये प्राथमिक विभागातील आश्रमशाळांची गळती व जिल्हा परिषदांच्या शाळा यामधील विद्यार्थ्यांच्या गळतीचा स्वतंत्र अभ्यास करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण प्रत्येक जिल्हयात व प्रत्येक शाळेत वेगवेगळे असल्याचे दिसून आले.

### प्राथमिक शाळेतील गळती

१६ ते २०% पर्यंत गळती झालेल्या ५ (१९.२३%) आश्रमशाळा व १ ते ५% पर्यंत गळती झालेल्या सर्वाधिक म्हणजे ४२.३०% आश्रमशाळा आढळून आल्या. जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांमध्ये १ ते ५% पर्यंत गळती झालेल्या ४०% शाळा व ६ ते १०% पर्यंत गळती झालेल्या २०% शाळा पाहणीमध्ये आढळून आल्या.

वरील आकडेवारीवरुन दोन्ही प्रकारच्या शाळांमधील प्राथमिक विभागातील गळती ही जवळ जवळ सारखीस निदर्शनास येते.

### माध्यमिक विभागातील गळती

इयत्ता ५ वी ते इयत्ता ७ या विभागामध्ये १ ते ५% गळती झालेल्या ३०.७६% आश्रमशाळा आढळून आल्या.

जिल्हा परिषदांच्या शाळांत इ.५ वी ते इ.७ वीया गटात १ ते ५% पर्यंत गळती होणाऱ्या ४०% शाळा आढळून आल्या.

वरील माहितीवरुन आश्रमशाळांमधील गळतीचे प्रमाण जिल्हा परिषदेच्या शाळांच्या तुलनेत कमी असल्याचे आढळून येते. यावरुन आश्रमशाळांमधील शैक्षणिक दर्जा चांगला आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

आश्रमशाळांमधील शिक्षकांची कार्यक्षमता चांगली असून (शिक्षण विभागाचे अधिकारी कमी भेटी देत असले तरी) आदिवासी विकास निरीक्षक, प्रकल्प अधिकारी यांच्या वारंवार भेटींनी आश्रमशाळांवर आदिवासी विकास विभागाचे चांगले नियंत्रण असल्याने शिक्षकांमध्ये शिस्त व वक्तशीरपणा यामुळेही शाळेचा दर्जा चांगल्या प्रकारचा राहण्यास मदत झाली आहे.

इयत्ता ८ वी ते १० वी मधील गळतीचे प्रमाण

आदिवासी भागात इ.८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण मुख्यत्वे आश्रमशाळांद्वारेच दिले जाते. तथापि, अमरावती जिल्हयातील एका जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये इ.१२ वी पर्यंत शिक्षण दिले जात असल्याचे निदर्शनास आले. पाहणी केलेल्या आश्रमशाळमध्ये १०% पर्यंत गळती झालेल्या ३८.४६% शाळा निदर्शनास आल्या. गळती जास्त असणाऱ्या कारणांचा शोध घेतला असता पालकांचे शिक्षणाबाबत अज्ञान ३४.६१% पालकांना व मुलांना शाळेविषयी गोडी नसणे, २७% विद्यार्थ्यांचे आजारपण, ११.५३%, दळणवळणाची सोय नसणे, मातृभाषेतून शिक्षण नसे इ.११.५३% ही कारणे आढळून आली. स्थलांतराने, लहान भावडांना सांभाळणे इ.कारणामुळे गळती होत असल्याचे निदर्शनास आले.

## प्रकरण क्र.५

## निरीक्षणात्मक बाबी व आदिवासी क्षेत्रातील शाळांचा शैक्षणिक दर्जा

५.१ क्षेत्रीय निरीक्षणामध्ये आश्रमशाळा व जिल्हा परिषदांचे शाळांचे शैक्षणिक दर्जाबाबत ज्या निरीक्षणात्मक बाबी आढळून आल्या त्या पुढीलप्रमाणे-

१. विद्यार्थी संख्येत वाढ-

आश्रमशाळा या अति दुर्गम भागात पोहोचल्याने निवासासह भोजन व्यवस्था असल्याने व माध्यमिक शिक्षणाची सोय आश्रमशाळेमध्ये असल्याने विद्यार्थी संख्येत वाढ झाली आहे.

२. शालेय इमारत

पाहणीच्या वेळी ९३१४ विद्यार्थी आश्रमशाळेत व १३९८ विद्यार्थी जिल्हा परिषदांच्या शाळेत सद्यस्थितीत शिक्षण घेत असल्याचे आढळले. यामध्ये ८५ टक्केपेक्षा जास्त विद्यार्थी हे अनुसूचित जमातीचे आढळून आले आहे.

निवडलेल्या २६ आश्रमशाळांपैकी २९३९ विद्यार्थ्यांना शालेय इमारत पुरते उर्वरित विद्यार्थ्यांना ५७ वर्ग खोल्यांची आवश्यकता असल्याचे आढळून आले. पाहणीत ९६% आश्रमशाळांना स्वत:च्या मालकीची शालेय इमारत आहे. ७३.०८% वर्ग हे पक्क्या इमारतीत भरतात.

जिल्हा परिषदांच्या निवडलेल्या १० शाळामध्ये आणखी १५ वर्ग खोल्यांची आवश्यकता असल्याचे आढळून आले. जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा (१००%) स्वत:च्या मालकीच्या व पक्क्या इमारतीत भरत असल्याचे पाहणीत आढळून आले.

३. गळतीचे प्रमाण

गळतीचे प्रमाण प्रत्येक जिल्हयात वेगवेगळे असल्याचे आढळून आले.

आश्रमशाळेमध्ये प्राथमिक विभागामध्ये विद्यार्थ्यांची गळती होत असल्याचे आढळले. ११ शाळांमध्ये १ ते ५ %, पाच शाळांमध्ये १९.२३% गळती होत असल्याचे आढळून आले.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये प्राथमिक विभागातील १ ते ५% गळती होणाऱ्या चार (४) शाळा आढळून आल्या.

४. शैक्षणिक तपासणी :-

जिल्हा परिषदांच्या शाळांची व आश्रमशाळांची तपासणी शिक्षण विभागांमार्फत करण्याच्या सूचना आहेत. शालेय वर्षामध्ये शाळेत दिल्या जाणाऱ्या विहित तीन भेटींशिवाय शाळेची वार्षिक तपासणी करणे अनिवार्य आहे. शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने शाळांना मार्गदर्शन करणे, शिक्षक व मुख्याध्यापकांच्या शैक्षणिक समस्या सोडविणे, वार्षिक तपासणी करणे, इ.बाबी तपासल्या जातात व मार्गदर्शन केले जाते.

असे असले तरी १९९२ ते १९९४ या तीन वर्षाच्या कालावधीत आश्रमशाळांना वार्षिक तपासणीसह ३१२ भेटी देणे अपेक्षित होते. तथापि, पाहणीमध्ये १६५ भेटी (५२.८८) झाल्याचे आढळले. पर्यायाने ज्या आश्रमशाळांची प्रतवारी झाली, त्यातील ३.८४% शाळांना 'अ' दर्जा व ३०% शाळांना 'ब' दर्जा प्राप्त झाल्याचे आढळले.

जिल्हा परिषदांच्या शाळांचे नियंत्रण शिक्षण विस्तार अधिकारी यांच्याकडे असल्याने या शाळांना भेटी देण्याचे प्रमाण तुलनेने जास्त आहे.

जिल्हा परिषदांच्या ७०% शाळांना सतत 'अ' दर्जा मिळत असून ६०% शाळांना 'ब' दर्जा मिळत असल्याचे पाहणीत आढळले.

४.अ. शिक्षण विभागाचे अधिकारी तुलनेने आश्रमशाळांना कमी भेट देतात. विस्तार अधिकारी व गट शिक्षण अधिकाऱ्यांच्या मुलाखतीत आश्रमशाळांना भेटी देण्याचे प्रमाण एवढे कमी का याची कारणे जाणून घेतली असता खालील निष्कर्ष हाती आले.

१. शासकीय आश्रमशाळा या अति दुर्गम भागात असून शाळांपर्यंत पोहोचण्यास विस्तार अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांचेकडे शासकीय वाहन नाही. तसेच त्या शाळांपर्यंत पोहोचण्यास सोयीस्कर अशी बस व्यवस्था नाही.

२. आदिवासी विकास विभागांच्या अधिकाऱ्यांचे शाळांना भरपूर मार्गदर्शन व भेटी होत असल्याने शिक्षण विभागाचे अधिकारी आश्रमशाळांना भेटी देण्यामध्ये टाळाटाळ करतात.

३. आश्रमशाळेतील शिक्षक वर्गाचे प्रशासन आदिवासी विकास विभागाकडे असल्याने आश्रमशाळेतील शिक्षकांच्या दृष्टीने शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांचे फारसे महत्व वाटत नाही.

४. शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी आश्रमशाळांना भेटी दिल्या पाहिजेत. याबाबत कोणत्याही स्पष्ट सूचना नाहीत अथवा किती भेटी दिल्या जाव्यात याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अथवा शासनाकडून कोणत्याही सूचना मिळालेल्या नाहीत.

५. शालेय गट संमेलन, शिबिरे, पाठसभा :-

शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी शिक्षकांची गट संमेलने, शैक्षणिक शिबिरे, पाठसभा, कृतिसत्रे उपयुक्त ठरतात. ही शिबिरे वेगवेगळ्या शाळांमध्ये फिरत्या ठेवण्याच्या सूचना असल्या तरी आश्रमशाळांमध्ये असे कार्यक्रम ठेवले जात नसल्याचे पाहणीत आढळून आले. पर्यायाने, आश्रमशाळांना या माध्यमातून मिळणारे मार्गदर्शनापासून वंचित राहावे लागते.

या संमेलनाना आश्रमशाळा शिक्षकांना निमंत्रित करण्याचे प्रमाणही कमी असल्याचे आढळून आले. केवळ २७% शाळांना निर्धारित वर्षात एकदा बोलावण्यात आले व ३८.४६% शाळांना ५ वेळा गट संमेलनास आमंत्रित करण्यात आले.

६. प्रशासकीय कार्यवाही :-

जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांचे बाबत अनियमितपणा,बेशिस्त आढळून आल्यास शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडून कारणे दाखवा नोटीस देणे, वेतनवाढ रोखणे, बिनपगारी रजा करणे, गोपनीय अहवालात नोंद घेणे, इ.उपाययोजना केली जाते. पर्यायाने शाळांवर चांगले नियंत्रण राहते.

आश्रमशाळांचे बाबतीत शैक्षणिकदृष्टया फारसे मूल्यमापन प्रकल्प अधिकारी यांचेकडून केले जात नाही. केवळ शाळांचे निवास, भोजन व प्रशासकीय बाब या भौतिक सुविधांकडे जास्त लक्ष दिले जाते. पर्यायाने आश्रमशाळांवर शिक्षण विभागाचे शैक्षणिक नियंत्रण नसल्याने या शाळांमधील बरेच शिक्षण अध्यापनामध्ये कुचराई करतात, असे आढळून आले.

७. आश्रमशाळांमध्ये शैक्षणिक कार्यक्रम व नियोजनांचा अभाव :-

आदिवासी विकास विभागाने आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा स्थापन केल्या. परंतू शैक्षणिक दर्जा, मूल्यमापन याची जबाबदारी शिक्षण विभागाकडून पार पाडली जात नाही. आदिवासी विकास विभागाने यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारली नाही. पर्यायाने शिक्षण विभागामार्फत शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडून ज्या

नवीन सूचना, शैक्षणिक कार्यक्रमातील नियोजन याबाबतची कोणतीही कार्यवाही आश्रमशाळांचे बाबतीत घडत नसल्याचे पाहणीत आढळले.

८. मातृभाषेतून शिक्षण :-

महाराष्ट्रामध्ये मराठीतून शिक्षण दिले जाते. आदिवासी जमातीतील काही जमातींची मातृभाषा मराठीशिवाय वेगळी आहे. त्यांना मराठीतून शिक्षण घेणे अवघड व कठीण वाटते. त्यामुळे मुले शाळेत रमत नाहीत. या मुलांना मराठीतून शिकविलेले समजत नाही. पर्यायाने मुले शाळा सोडून देतात. यासाठी त्यांना त्यांच्याच मातृभाषेतून शिक्षण देण्याची गरज निर्माण झाली आहे.

९. जिल्हा परिषदांच्या शाळा या अनिवासी असल्याने शिक्षकांचे राहण्याचे ठिकाण व शाळा यामध्ये अंतर असते. कधी कधी शिक्षक परगांवी राहतात. तर शाळा गांवात असतात. अशावेळी आठवडे बाजार, गांवातील सार्वजानिक कार्यक्रम, सण, इ.कारणांनी शाळा वेळेआधीच सोडून दिली जाते, असे पाहणीत आढळून आले.

१०. शिक्षकांचे प्रमाण:-

पाहणीमध्ये विद्यार्थी संख्येच्या तुलनेत शिक्षकांचे प्रमाण आहे काय, हे तपासले असता निवडलेल्या शासकीय आश्रमशाळांमध्ये एकूणात ३० विद्यार्थ्यामागे १ शिक्षक व जिल्हा परिषदेच्या निवडलेल्या शाळांमध्ये २५ विद्यार्थ्यांमागे सरासरी एक शिक्षक असल्याचे आढळून आले. ग्रामीण आदिवासी भागातही शिक्षकांची संख्या समाधानकारक असल्याचे या माहितीवरुन दिसून आले.

पाहणीमध्ये भेट देण्यात आलेल्या गोहे, ता.आंबेगांव येथील आश्रमशाळा सोडल्यास उर्वरित बहुसंख्य आश्रमशाळांमध्ये वर्गात शैक्षणिक साहित्य, उदा.तक्ते, तारणचित्रे, चित्रे इ.शैक्षणिक साहित्याचा अभाव दिसून आला.

११. शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना दिली जाणारी शालेय क्रमिक पुस्तके, वह्या साधारणत: जुलै महिन्यामध्ये दिली जातात. शाळा जूनमध्ये सुरु झाली असली तरी वह्या पुस्तके मिळण्यास जवळ जवळ दोन महिने लागतात व याचा विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर परिणाम होऊन शैक्षणिक दर्जा राखण्यात अडथळा निर्माण होतो. जिल्हा परिषदांच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांनाच वह्या, पुस्तके व इतर शालेय साहित्य पुरवावे लागत असल्याने वरीलप्रमाणे फारसा उशीर केला जात नाही. अगदी अपवादात्मक परिस्थितीतच (उदा.आर्थिक परिस्थिती फारच बिकट असणे, बाजारात क्रमिक पुस्तके, वह्या नसणे) उशीर लागतो.

## ५.२ आश्रमशाळा व जिल्हा परिषदांच्या शाळांमधील शिक्षणातील गळतीची कारणमिमांसा :-

सर्वेक्षणातून गळती झालेल्या मुलांच्या गळतीची कारणे काय होती, याची माहिती घेतली असता खालील कारणे आढळून आली.

### १. आर्थिक कारण :-

आदिवासींची आर्थिक परिस्थिती पाहता ९२% पेक्षा जास्त कुटुंबे दारिद्रय रेषेखालील गटात मोडतात. पर्यायाने कुटुंबातील लहान मुले प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नासाठी मदत करीत असतात.

ज्या मुलांना घरात काम करावे लागते ती मुले शाळेत येत नाहीत. इतर जी मुले शाळेत येतात ती बहुधा लहान वयाची असतात. त्या काळात घरात मदत होण्याऐवजी त्यांचा उपद्रवच अधिक होत असतो. मुले ९-१० वर्षांची होऊन मदत करण्याजोगी झाली की, त्यांना लगेचच शाळेतून काढण्यात येते व गळती दूर होते.

### २. आश्रमशाळेतील पाल्य पालकांपासून दूर

वयाच्या ६ व्या वर्षापासून मुलांना आश्रमशाळेत घालावे लागते. पर्यायाने पालक व पाल्य यांच्यात ताटातूट होते. मुलांची बालवयापासून पालकांपासून ताटातूट होते. सण, सुटी या कालावधीत मुले घरी गेल्यावर सुटी संपली तरी आश्रमशाळेत येण्याचे टाळतात. घरची ओढ वाटत असल्याने अशाप्रकारच्या गळतीचे प्रमाण लहान मुलांचे बाबत अधिक असल्याचे मुख्याध्यापकांनी मुलाखतीत सांगितले.

लहान मुलांना शाळेत गोडी वाटेनाशी होऊन त्यांचे पर्यावसान शाळा सोडून देण्यात होते. अवघड वाटणाऱ्या एखाद्या अभ्यासक्रमावर मुले आपण होऊन शंका निरसन करुन घेत नसल्याचेही मुख्याध्यापकांनी मुलाखतीत सांगितले.

### ३. ध्येयनिष्ठ शिक्षकांचा अभाव :-

ग्रामीण भागामध्ये शहरी भागांतील शिक्षक नेमला तर त्याला ग्रामीण भागातील शिक्षणाबद्दल. विद्यार्थी पालक व शाळेबद्दल आपुलकी, आस्था व प्रेम असत नाही. ध्येयाने प्रेरित, निष्ठावान शिक्षक फारच थोडे आढळून येतात. ग्रामीण भागातील वातावरणात हे शिक्षक रमत नाहीत. अशावेळी शिक्षकांचे शाळेकडे दुर्लक्ष होते व अभ्यासात मुले कच्ची राहून 'स्थगन' होते व पुढे पुढे मुले शाळेतून गळतात.

४. परीक्षा पध्दतीतील त्रुटी :-

नवीन परीक्षा पध्दतीमध्ये इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना क्षमता चाचणी घेऊन वरचे वर्गात घालण्याच्या शिक्षण विभागाच्या सूचना आहेत. अशावेळी अभ्यासात कच्ची असणारी मुलेही वरचे वर्गात घातली जातात. इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी पर्यंतच्या मुलांना नापास न करण्याच्या शासनाच्या धोरणामुळे कच्ची मुलेही वरच्या वर्गात घातली जातात. तथापि, पुढील वर्गामध्ये (इ.५ वी,६ वी,७वी) अभ्यासक्रम वाढल्याने हा अभ्यास मुलांना झेपत नाही. पायाच कच्चा राहिल्याने पुढच्या वर्गामध्ये मुलांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो व त्याचे पर्यावसान शाळा सोडण्यात होते.

परीक्षेमध्ये जे गुण मिळतात,त्यावर पाल्याचे भवितव्य अवलंबून असते. शिक्षक परीक्षेचा निकाल चांगला कसा लागेल याकडे जास्त लक्ष देतात. त्यामुळे परीक्षेत आवश्यक गुण मिळविण्यात कमी पडणारा मुलगा नापास होतो. त्याच्या अंगी असणाऱ्या इतर कला गुणांचा विचार केला जात नाही. त्यामुळे विद्यार्थी निराश होतो व त्याचे मन शाळा सोडून देण्याकडे वळते.

५. शाळा व घर यातील अंतर :-

मुख्याध्यापकांनी मत व्यक्त केले की, पाहणी केलेल्या गांवामध्ये जरी शाळा असली तरी वाडी वस्तीवरील मुलांना शाळेत येण्यासाठी दररोज पायपीट करावी लागते. त्यामुळे मुलांना शाळेत येऊन अभ्यास करणे शक्य होत नाही. कित्येक वेळा एवढे अंतर चालून जाण्याचा कंटाळा येत असल्याने मुले शाळा बुडवितात व त्याचा परिणाम अभ्यास कच्चा राहून एक दिवस शाळा सोडून जाण्यात होतो. लांबच्या अंतरावरील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुलींना पाठविणे सुरक्षित वाटत नाही.

६. द्वि-शिक्षक शाळांच्या अध्यापनावर परिणाम :-

पटांच्या संख्येच्या प्रमाणात वर्ग खोल्या नाहीत. अपुऱ्या वर्ग खोल्यांमध्ये वर्ग भाड्याच्या जागेत अथवा एकाच खोलीत जास्त वर्ग भरवावे लागतात. त्यामुळे एका वर्गात चारपाच इयत्तांचा अभ्यास घेणे शिक्षक व विद्यार्थी यांनाही अत्यंत अडचणीचे जाते.

माहिती मागविलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये द्वि-शिक्षकी शाळांचे प्रमाण ४०% आढळल्याने त्याचा परिणाम अध्यापनावर फार मोठ्या प्रमाणात होतो. दोन शिक्षकांना एका खोलीत इयत्ता १ ते ५ वी पर्यंतचा अभ्यास घ्यावा लागतो. त्यासाठी फळा बहुतेक एकच असतो. एकापेक्षा जास्त वर्गावर शिकविताना

तासिकांप्रमाणे अभ्यास होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण निरस वाटू लागते व पर्यायाने विद्यार्थ्यांची शाळेत गळती होते.

७. आश्रमवासीय विद्यार्थ्यांचे आजारपण :-

आश्रमशाळा या वसतीगृहयुक्त शाळा आहेत. राहणे तसेच अध्ययन एकाच खोलीत चालत असते. त्यामुळे आजारपणात आजारी विद्यार्थ्याला घरी पाठविण्यात येते. विद्यार्थीआजारपणातून बरा झाला तरी आणखी काही दिवस आश्रमशाळेकडे फिरकत नाही व शाळेकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे विद्यार्थी नापास होतात व शैक्षणिक गळती होते.

५.३ सामाजिक कारणे :-

१. अंधश्रध्दा :-

प्राथमिक शिक्षणाच्या पध्दतीमधील कितीतरी दोष एकाच गोष्टीमुळे निर्माण होतात. ती गोष्ट म्हणजे पालकांची निरक्षरता. उदा. त्यांचे शिक्षणाविषयी औदासिन्य, मुलींना शाळेत पाठविण्यास विरोध, मुलांच्या शालेय प्रगतीबाबत अनास्था आणि त्याचे विद्यार्थ्यांची गैरहजेरी, गळती व अवरुध्दतेत होणारे पर्यावसान.

ग्रामीण भागातील जनतेवर अंधश्रध्देचा फार मोठा पगडा आहे. व्यक्ती अथवा लहान मूल आजारी पडले तर डॉक्टरांकडे नेऊन औषधोपचार करण्याऐवजी भगत अंगात येणे, देवऋषी अशा अंधश्रध्देला बळी पडतात. या सर्वांचा परिणाम मुले व कुटुंबावर होतो. परिणामतः मुलांमध्ये सुध्दा शाळा सोडून देण्याचा विचार मनामध्ये निर्माण होतो. पाहणी केलेल्या विद्यार्थ्यांचे पालक निरक्षर असल्याने वरील बाब ही वस्तुस्थितीस धरुन आहे.

२. बालविवाह पध्दती :-

आदिवासी समाजात लहान वयातच पाल्यास अर्थप्राप्तीसाठी कामास लावले जाते. अशावेळी पालक त्याचा विवाह करुन देण्यात धन्यता मानतात. पालक सामाजिक जबाबदारीतून मुक्त होतात. जे वय खेळण्याचे, शाळा शिकविण्याचे व स्वच्छंदी जीवन जगण्याचे असते. त्या वयातच पाल्यास विवाहबंधनात अडकवून पालक स्वतःला धन्य समजतात. आदिवासी समाजात बालविवाह पध्दती रुढ असल्याचे मुख्याध्यापकांनी मत दिले आहे.

६. परंपरागत व्यवसाय व शिक्षणाकडे दुर्लक्ष :-

काही पालकांना असे वाटते असते की, परंपरागत व्यवसाय करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकत नाही. उलट शिक्षण घेऊन मुलगा आपला व्यवसाय करील की नाही ही भिती वाटत असल्याने त्याला शाळेमध्ये घालून शिकविण्याचे धाडस पालक करीत नाही आणि केलेच तर अक्षर ओळख व अंकज्ञान व्हावे,इतपत शिक्षण त्यांना भरपूर वाटते. म्हणून मुलांची शाळेतून गळती होते.

७. पुरुष प्रधान संस्कृती :-

भारतामध्ये पुरुषप्रधान संस्कृती आहे. स्त्रियांनी शिक्षण घेऊन करायचे काय ? शेवटी ' चूल व मूल ' सांभाळावयाचे अशा सामाजिक विचार सरणीमुळे मुलींना शाळेत पाठविण्यापासून व पुढील शिक्षण घेण्यापासून जाणीवपूर्वक दूर ठेवले जाते व पर्यायाने स्त्रियांमधील निरक्षरतेचे प्रमाण वाढू लागते.

५.४ नवीन शिक्षण पध्दतीतील दोष :-

१. अभ्यासक्रमात धंदे शिक्षण/व्यावसायिक शिक्षणाचा अभाव :-

शिक्षण म्हणजे पुस्तकी ज्ञान, जीवनाशी सुसंगत व्यवसायाशी निगडीत, व्यवहार ज्ञानाशी सांगड घालून शिक्षण दिले जात नाही. अभ्यासक्रम हा शहरी मुलांचा विचार करुन तयार केला जातो. आदिवासी डोंगराळ व अति दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचा विचार करुन केला जात नाही. त्यामुळे आदिवासी भागातील मुलांना अभ्यासक्रम समजत नाही व समजल्यास जड जातो, अवघड वाटतो. पर्यायाने मुले शाळा सोडून जातात. पाहणीतील सर्व शाळांमध्ये पुस्तकी शिक्षणाखेरीज व्यावसायिक शिक्षण दिले जात नसल्याचे आढळून आले आहे.

२. शाळांमधील शिक्षकांची बदली व नेमणूका :-

शाळांमधील शिक्षकांची पदे दीर्घकाळ रिक्त राहू नयेत यासाठी कधी कधी तात्पुरत्या स्वरुपात शिक्षकांची नेमणूक केली जाते. किंवा कधी कधी एका शिक्षकाकडेच दुसऱ्या वर्गाचा पदभार सोपविला जातो. अशावेळी तात्पुरत्या नेमणूकीतील शिक्षक मन लावून अध्यापन करीत नाही व दोन वर्गाचा पदभार दिलेल्या शिक्षकांना अध्यापन करतांना दोन वर्गावर अध्यापन करणे अडचणीचे होते. तसेच शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस प्रशासकीय तसेच तक्रारीनुसार बदल्या, वरील सर्वच कारणांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जा घसरण्यावर होतो, असे मत मुख्याध्यापकांनी व्यक्त केले.

३. मुलींसाठी आत्मसन्मान व स्व-संरक्षणात्मक शिक्षणाचा अभाव :-

आत्मविश्वास वाढीस लागेल, असा अभ्यासक्रम आज आदिवासी भागातील शाळा व आश्रमशाळांमध्ये नाही. मुलींसाठी स्व-संरक्षणात्मक अभ्यासक्रम नाही त्यामुळे सामाजिक असुरक्षितता वाढते. बलात्कार. अत्याचार, अशा प्रकारांमध्ये वाढ होते. सामाजिक असुरक्षिततेमुळे पालकही मुलींना शाळेत पाठविण्यास नाखूष असतात.

विशेषत: आश्रमशाळेचे बाबत वरील बाबी अनुभवास येतात.

४. अयोग्य व्यवस्थापन :-

ज्या आदिवासी क्षेत्रातून विद्यार्थी शाळेत येतात, तेथील स्थानिक गरजा, नैसर्गिक वातावरण. सण. शेतीची कामे, यांचा मेळ न बसल्याने या काळात मुलांना शाळा बुडवावी लागते.

सारांश :-

बहुतांश जिल्हा परिषदेच्या शाळा व शासकीय आश्रमशाळा या दोन्ही प्रकारच्या शाळांमध्ये काही उणीव असल्याचे दिसून येते. उदा.शाळेतील विद्यार्थ्यांसाठी जागेची कमतरता, शैक्षणिक साहित्याचा पुरेसा पुरवठा नसते, प्रशिक्षित शिक्षकांचे प्रमाण कमी असणे, शाळा परिसरातील वातावरण आल्हाददायी नसणे, शाळांची वेळेवर शैक्षणिक/वैद्यकिय तपासणी न होणे, शाळां लांब अंतरावर असणे व शाळांत शैक्षणिक सुविधा पुरेश्या नसणे इ.त्यातच भर म्हणून प्रशासकीय नियंत्रण पुरेश्या प्रमाणात नसणे याचा उल्लेख करावा लागेल.

वरील सर्व उणीवांचा परिणाम म्हणजे, आदिवासी भागातील जिल्हा परिषद शाळा व आश्रमशाळा यातील शैक्षणिक दर्जा शहरी भागातील शाळांपेक्षा बराच कमी प्रतीचा असल्याचे दिसून येते. वरील दोन्ही प्रकारच्या शाळांमध्ये गळतीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येते. शाळांच्या निकालांच्या बाबीत दोन्ही प्रकारच्या शाळांमध्ये थोडाफार बदल असल्याचे दिसून येते.

# प्रकरण क्र.६

## सूचना तथा शिफारशी

भारताचे थोर महर्षी दादाभाई नौरोजी यांनी १६ सप्टेंबर,१८८२ या दिवशी भारतीय शिक्षण आयोगला एक निवेदन सादर केले होते. त्यात भारतात सार्वत्रिक व सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरु करण्यात यावे, म्हणून आग्रह धरला होता. त्या महात्म्याचे हे स्वप्न अजूनही अपूरेच राहिले आहे. जर योग्य योजना आखली व मन:पूर्वक प्रयत्न केले जतर हे स्वप्न साकार होऊ शकेल.

२६ जानेवारी, १९५० या दिवसापासून भारतातील सर्व राज्यांमधील बालकांना वयाच्या १४ व्या वर्षापर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यास प्रारंभ झाला. ज्या देशात प्रचंड प्रमाणात निरक्षरता आहे, त्या देशात प्राथमिक शिक्षकाचा तडाखेबंद कार्यक्रम कार्यवाहीत आणू शकणार नाही. तथापि, साक्षरतेचे प्रमाण कुर्म गतीने का होईना वाढत आहे. विद्यार्थ्यांचे शाळेतील दाखलातीचे प्रमाणामध्ये वाढ झाली आहे. आदिवासी भागामध्ये 'आश्रमशाळांचे' योगदान शिक्षणाच्या प्रसारास फारच मौलिक ठरले आहे. त्याचा परिणाम चांगलहा होत असल्याचे प्रस्तुतच्या मूल्यमापन अहवालात निदर्शनास आले आहे. तथापि, आदिवासींच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक प्रयत्न होऊन शैक्षणिक दर्जा वाढविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करुन शेवटपर्यंत मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी व विद्यार्थींनी टिकून राहिल्या पाहिजेत, यासाठी पुढील उपाययोजना सुचविण्यात येत आहेत.

### ६.१ आर्थिक कारणांवर उपाययोजना :-

१. ज्या मुलांना कुटुंबात व कुटुंबासाठी काम करावे लागते व या कारणासाठी शाळा सोडावी लागते, अशा मुलांसाठी रात्रीच्या शाळा, अंशिक शिक्षण योजना अथवा अनौपचारिक शिक्षण पध्दती स्विकारण्यात यावी. अशा मुलांना शाळेत येण्यास प्रवृत्त करण्यासाठी दरमहा त्यांना काही आर्थिक मदत देण्यात यावी, जेणेकरुन पालक अशा मुलांना शाळेत पाठविण्यास आडकाठी करणार नाहीत व त्याचा दुसरा फायदा असा की, ९ ते १४ वर्षे वयोगटातील बहुसंख्य मुलांची घरच्या कठीण आर्थिक परिस्थितीतून सुटका होऊन त्यांना शाळेत घालणे शक्य होईल.

२.  पाळणाघराचे नियोजन :-

ज्या मुलांना गुरे तसेच लहान भावंडे सांभाळण्यासाठी शाळा सोडावी लागते अथवा गैरहजर राहावे लागते, अशा मुलांना मोकळीक मिळून शाळेत उपस्थित राहता यावे, यासाठी प्रत्येक गांवामध्ये पाळणाघरं असावीत. ही पाळणाघरे चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात यावी.

३.  दुय्यम व्यवसायांना चालना :-

ज्या आदिवासी पालकांना आर्थिक कारणासाठी मुलांच्या श्रमाची गरज भासते अशा आदिवासींना उपजिविकेचे कायमस्वरुपी साधन उपलब्ध होईल, अशा शासकीय योजना कार्यक्रमांचा लाभ देण्यात यावा उदा. त्यांची स्वत:ची हस्तकला असल्यास त्यास उत्तेजन देण्यात यावे. दुग्धविकास, कुक्कुटपालन, स्त्रियांसाठी घरगुती उद्योगांचे प्रशिक्षण व उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी भांडवल गुंतवणूक अर्थसहाय्य देण्यात यावे, जेणेकरुन आर्थिक कारणासाठी पाल्याच्या सेवेचा उपयोग करुन घेतला जाणार नाही.

४.  आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन भत्ता :-

ज्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुलींची उपस्थिती वाढविण्यासाठी रु.१/-प्रमाणे प्रोत्साहन भत्ता दिला जातो, त्या प्रमाणे मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी मुलांनाही प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, जेणेकरुन मुलांची उपस्थिती व शाळेत टिकून राहण्याचे प्रमाणही वाढेल.

६.२  सामाजिक कारणांवरील उपाययोजना :-

१.  अंधश्रध्दा निर्मूलन :-

आदिवासी समाजातील अंधश्रध्दा ही केवळ निरक्षरतेतून निर्माण झाली आहे. ही निरक्षरता कमी करण्यासाठी आदिवासी बांधवांना प्रथम साक्षर केले पाहिजे. प्रसार माध्यमांद्वारे अंधश्रध्दा कमी केल्या पाहिजेत. 'अंधश्रध्दा निर्मूलन समिती' सारख्या स्वयंसेवी संस्थामार्फत अंधश्रध्देचा पगडा कमी केला पाहिजे.

२.  बालविवाह पध्दतीस आळा :-

शाळेतील विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढविण्याचे दृष्टीने बालविवाह पध्दतीचे तोटे निदर्शनास आणून देऊन आदिवासी समाजातील या अनिष्ट रुढीची प्रथा बंद केली जावी. यासाठीही स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात यावी. बालविवाह करणाऱ्या पालकांवर कठोर कारवाई केली जावी.

३. परंपरागत व्यवसाय करण्यासाठी मुले शाळा सोडून देतात. शिक्षणामुळे त्याच व्यवसायात (परंपरागत) आधुनिक तंत्रज्ञान वापरुन जास्त फायदा होईल, हे त्यांना पटवून दिले पाहिजे. शिक्षण घेतलेल्या मुलांना स्थानिक पातळीवर उद्योगधंदा उपलब्ध करुन दिला तर शिक्षणामुळे मुले दुरावतात, ही चुकीची समजूत दूर होईल.

४. मुलींच्या शिक्षणाचे महत्व पटवून देण्याची गरज :-

मुलांना जसे शिक्षण घेण्याबाबत प्रथम स्थान दिले जाते, तसेच मुलींच्या शिक्षणाचे महत्वही पालकांना पटवून दिले पाहिजे. माता शिक्षित झाली तरच कुटुंबे शिक्षित होऊ शकतील. याचे महत्व पालकांना पटवून दिले पाहिजे. यासाठी दूरदर्शन, रेडिओ, यासारख्या प्रसार माध्यमांचा आदिवासी भागात वापर केला गेला पाहिजे.

६.३ भौतिक कारणांवरील उपाययोजना :-

शाळांच्या भौतिक परिसराचा, शाळांचा शैक्षणिक दर्जा, विद्यार्थ्यांची उपस्थिती यावर परिणाम होत असतो, या भौतिक कारणांवरील उपाययोजना पुढीलप्रमाणे -

१. पुरेशा वर्ग खोल्या :-

आश्रमशाळा व जिल्हा परिषदांच्या शाळांतील विद्यार्थ्यांना बसण्यास पुरतील एवढ्या वर्ग खोल्या असाव्यात. या खोल्या सर्व सोयींनी युक्त असाव्यात. शाळेच्या परिसरात वृक्षारोपण केलेले असावे. त्यामुळे शाळेतील वातावरण उल्हासित राहून विद्यार्थी शाळेत येतील.

२. प्रौढांच्या निरक्षरतेचे उच्चाटन :-

प्राथमिक शिक्षणातील दोष म्हणजे प्रौढांची किंवा पालकांची निरक्षरता. मुलांच्या सार्वत्रिक शिक्षणाच्या योजनेत प्रौढांसाठी निरक्षरतेच्या उच्चाटनाच्या कार्यक्रमांचीही जोड दिली गेली तर ते अधिक उपयुक्त ठरेल. आई-वडिलांना मिळालेल्या शिक्षणामुळे मुलांच्या शाळेतील उपस्थितीच्या देखरेखीची अंमलबजावणी आपोआप होते. गळती व स्थगिती यावर जो प्रचंड पैसा खर्च होतो, त्या मानाने प्रौढांची निरक्षरता नष्ट करण्यास कितीतरी कमी खर्च करावा लागेल. यासाठी सायंकाळी साक्षरता वर्ग चालविण्यात यावेत, सर्वच पालकांना शिक्षणाचे महत्व पटवून द्यायला हवे.

३. आश्रमशाळांची प्रतिमा उंचावण्यासाठी व आश्रमशाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी शिक्षण व निवास हे दोन्ही विभाग वेगवेगळे व्हावयास हवेत. विद्यार्थ्यांना शाळेचे वेगळेपण वाटावयास हवे. आश्रमशाळेतील शिक्षकांनाही शाळेचे वेगळेपण पटावयास हवे.

४.	शाळांमधील प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहावे यासाठी व वैद्यकिय कारणास्तव त्यांची शाळेत अनुपस्थिती होऊ नये, यासाठीही प्राथमिक विभागातील मुला-मुलींची आरोग्य तपासणी वर्षातून किमान दोनदाकरण्यात यावी.

५.	आदिवासी क्षेत्रातील ५३.८५% शाळा दुर्गम व डोंगराळ भागात आहेत. अशा गांवापर्यंत दळणवळण व इतर नागरी सुविधांचा अभाव आहे. अशा शाळांशी झटकन संपर्क साधता येत नाही. दळणवळण सुविधा अभावी वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी व शिक्षण विभागाचे अधिकारी दुर्गम भागातील शाळांना वरचेवर भेटी देऊन मार्गदर्शन व तपासणी करु शकत नाहीत. अशा शाळांवर शिक्षणाधिकाऱ्यांचे नियंत्रण नसल्याने शाळांचा दर्जा चांगला राहीलच, याची खात्री नाही. यासाठी दुर्गम भागात बारमाही रस्त्यांची सोय उपलब्ध करुन देऊन दळणवळण संपर्क वाढविण्यात यावा.

६.	अध्यापक व शिक्षण :-

आदिवासी भागात काम करणाऱ्या शिक्षकांना त्या भागातील आदिवासी भाषेची व संस्कृतीची माहिती असणे आवश्यक आहे. तरच शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषेतून अध्यापन करु शकेल.

आदिवासी क्षेत्रातील दुर्गम भागात शिक्षक नेमतांना शिक्षा म्हणून बदली करु नये, उलट त्याला बढती देऊन पाठवावे. किंवा नव्याने भरती करण्यात येणाऱ्या शिक्षकांना प्रथम नेमणूकीचे आदेश दुर्गम भागात देण्यात यावेत, जेणेकरुन नोकरीच्या सुरवातीपासूनच दुर्गम भागात राहण्यास शिक्षकांची मानसिक तयारी होईल अथवा नेमणूकीचे वेळी सक्तीने निश्चित कालावधीसाठी आदिवासी क्षेत्रात काम करण्याची शिक्षकांची मानसिक तयारी करावी.

७.	मुलींसाठी आत्मसन्मान व स्व-संरक्षणात्मक शिक्षण देण्याची गरज :-

अभ्यासक्रमामध्ये मुलींमध्ये आत्मविश्वास वाढीस लागेल, अशा अभ्यासक्रमाचा समावेश नाही. त्यामुळे, सामाजिक असुरक्षितता, बलात्कार, अशा प्रकारामध्ये वाढ होत असते. असे प्रकार आदिवासी भागातील मुलींबाबत होऊ नयेत म्हणून शाळांमधील अभ्यासक्रमात 'कराटे''शारिरीक शिक्षण' इत्यादी अभ्यासक्रमाची जोड देण्यात यावी.

८. अभ्यासक्रमात जीवनाश्यक शिक्षणाचा समावेश व्हावा :-

चालू शिक्षण पध्दतीमध्ये विद्यार्थी व्यवहारी दृष्टीकोनातून भाषा, गणित, भूगोल, इतिहास, व्याकरण, इत्यादि विषयांचे अध्ययन करतात. परंतू ,जीवनास आवश्यक व आयुष्यात प्रत्येकाला ज्या भूमिका कराव्या लागतात त्या निभावण्याच्या दृष्टीने विद्यारर्थ्याला शिक्षण मिळत नाही. यासाठी जीवनाशी सुसंगत शिक्षाण विद्यार्थ्याला मिळावयास हवे.

६.४ शाळांचा शैक्षणिक स्तर वाढविण्याच्या दृष्टीने व गळती कमी करण्यासाठी उपाययोजना :-

१. गट शिक्षण अधिकारी व विस्तार अधिकारी यांचे नियंत्रण :-

अ. आदिवासी आश्रमशाळांवर शिक्षण विभागांच्या अधिकाऱ्यांचे नियंत्रण कमी असल्याचे तक्ता क्र.४.७ वरुन आढळले. याबाबत संशोधन गटास असे सुचवावेसे वाटते की, आदिवासी आश्रमशाळांची संख्या महाराष्ट्रात ७२० इतकी आहे. एवढ्या मोठ्या संख्येतील आश्रमशाळांसाठी शिक्षण अधिकाऱ्यांची स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात यावी. प्रत्येक प्रकल्प अधिकारी कार्यालयांतर्गत एक गट शिक्षण अधिकारी व दोन शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची नेमणूक करुन आश्रमशाळांवर नियंत्रण ठेवून त्यांचा दर्जा सुधारण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात यावी.

किंवा

ब. आश्रमशाळांवरील नियंत्रण, भेटी, तपासणी यंत्रणा अधिक दृढ करण्याच्या दृष्टीकोनातून शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना वरिष्ठ पातळीवरुन सूचना देण्यात याव्यात. यामध्ये आयुक्त, आदिवासी विकास यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाचे अधिकारी भेटी देतात किंवा कसे यावर नियंत्रण करावे.

किंवा

क. आश्रमशाळांवर शैक्षणिक नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना आदिवासी विकास विभागामध्ये प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे. जेणेकरुन शाळांचा शैक्षणिक स्तर वाढेल.

ड. ज्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये 'भारतीय प्रशासन सेवेतील' 'प्रकल्प अधिकारी' आहेत, अशा प्रकल्पातील शिक्षण विभागाचे जे अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळांना वेळेवर भेटी देत नाहीत व तपासणी करीत नाहीत, अशा शिक्षण विभागांच्या अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात यावी.

२. शालेय गट संमेलने, शिबिरे, पाठसभा व इतर उपक्रम यांना सर्व आश्रमशाळेतील शिक्षकांना नियमितपणे आमंत्रित करण्यात यावे. जेणेकरुन प्राथमिक शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकांना शैक्षणिक मार्गदर्शन होईल.

३. **शैक्षणिक कार्यवाही करण्याचे अधिकार शिक्षण विभागाचे अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात यावेत :-**

आश्रमशाळा मुख्याध्यापक व शिक्षण यांचेबाबत अध्यापन, शालेय शिस्त, अनियमितपणा, याबाबत काही त्रुटी आढळून आल्यास त्याबाबत कार्यवाही करण्याचे अधिकार शिक्षण विस्तार अधिकारी यांना देण्यात यावेत,

पर्यायाने अध्यापनाबाबत शिक्षक अधिक जागरुक होतील.

४. **मातृभाषेतून शिक्षण :-**

आदिवासी भागातील ज्या आदिवासी जमातीची मातृभाषा मराठीशिवाय वेगळी आहे, त्यांच्या मुला-मुलींना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण देण्याची सुविधा शिक्षण खात्याकडून व्हावी, यासाठी इ.१ ली ते २ री तील ची पुस्तके त्यांच्यासाठी मातृभाषेतून करण्यात यावीत. शिवाय अध्यापनासाठी स्थानिक शिक्षक नेमण्यात यावेत.

५. आठवडे बाजार, स्थानिक कार्यक्रम इ.कारणांना शाळा वेळेआधी सोडून दिली जात नाही ना ? याबर शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी कडक नियंत्रण ठेवावे.

६. इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या मुलांना वरचे वर्गात घालतांना मुलांच्यात आवश्यक क्षमतांचा विकास करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. मुख्याध्यापकांनी या बाबीवर लक्ष ठेवून मुलांना आवश्यक क्षमता प्राप्त झाल्या किंवा कसे यांची वारंवार चाचणी घ्यावी. जेणेकरुन पूर्व प्राथमिक विभागात मुलांचा अभ्यासाचा पाया पक्का होऊन पुढील अभ्यासक्रमामध्ये अडचणी निर्माण होणार नाहीत. त्यामुळे मुलांची गळती कमी होण्यासही मदत होईल.

७. पुस्तकी शिक्षणाबरोबरच मुलांचे अंगी असणाऱ्या कला गुणांचाही विचार विद्यार्थ्याला वरचे वर्गात घालताना करण्यात यावा व योग्यवेळी विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांनाही वाव देण्यात यावा.

८. शाळा व घर यातील अंतर कमी करणे-

नमुना पाहणीत १० टक्के जिल्हा परिषदेच्या शाळा व ५० टक्के आश्रमशाळा गांवाबाहेर आहेत, असे दिसून आले. अशा गांवाबाहेरील शाळा अथवा घरापासून दूर अंतरावर असणाऱ्या शाळांचे अंतर हे फार तर

किमान २/३ कि.मी. परिसरातील विद्यार्थ्यांसाठी शाळा उघडण्यात याव्यात. जेणेकरुन शाळेत येण्यास मुले कंटाळणार नाहीत. मुलींनाही शाळेत पाठविणे पालकांना सुरक्षित वाटेल व शाळा सोडून जाण्याचे विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी होईल.

९. ध्येयनिष्ठ व स्थानिक शिक्षक आदिवासी भागात नेमावेत :-

आदिवासी भागात तळमळीने अध्यापनाचे कार्य करणाऱ्या शिक्षकांची नेमणूक करण्यात यावी. केवळ पगारापोटी शिक्षक नेमण्यात येऊ नयेत. ध्येयनिष्ठ व सेवाभावी असे आदिवासी शिक्षक नेमावेत. त्यांच्याकडून विद्यार्थ्यांची बौध्दिक पात्रता, भाषाशैली व संस्कार इतर समाजातील विद्यार्थ्यांच्या बरोबरीने तयार होतील, असे पाहणे आवश्यक आहे.

१०. शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याचा वापर वाढविण्यात यावा :-

पाहणीतील पुष्कळ आदिवासी आश्रमशाळामध्ये अध्ययनाच्या दृष्टीने उपयुक्त भित्तीचित्रे, तक्ते, नकाशे इत्यादी शैक्षणिक साहित्याचा अभाव आढळून येतो. याबाबत असे प्रकर्षाने सुचविण्यात येत आहे की, शैक्षणिक साहित्याशिवाय अध्यापन अपूरे वाटते. अध्यापन दृढ होण्यासाठी व सतत विद्यार्थ्यांच्या नजरेस कृतीयुक्त शैक्षणिक साहित्य आल्यास अवघड अभ्यासही मुलांच्या लक्षात राहतो. यासाठी शाळांमधील प्रत्येक वर्गात शैक्षणिक वातावरण राहील, असे शैक्षणिक साहित्य लावण्यात यावे.

जिल्हा परिषद शाळा व आश्रमशाळा अंतर्गत व बाह्य परिसर सुंदर व प्रसन्न असावा. यासाठी शाळांमधील वर्ग प्रसन्न, योग्य ठिकाणी सुविचार लिहिलेले असावेत. समोरील वर्ग खोल्यांच्या भिंतींवर थोर समाज सुधारक, नेते व ऐतिहासिक पुरुषांची मोठी चित्रे रंगविलेली असावीत. शाळेच्या क्रीडांगणात ध्वजारोहण खांब असावा. वरील बाबींची आश्रमशाळांमध्ये पूर्तता त्वरीत होणे अत्यंत गरजेचे आहे.

११. द्वि-शिक्षकी शाळांबरोबरच वर्ग खोल्यांची संख्या वाढविण्याची गरज

जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये एक शिक्षकी शाळांऐवजी द्वि-शिक्षकी शाळांखा शासनाचा निर्णय स्तुत्य आहे. तथापि, इ.१ ली ते इ.४ थी पर्यंतचे वर्ग जेथे भरतात तेथे खोल्यांची संख्या मात्र वाढविण्यात आलेली नाही.

यासाठी किमान आणखी दोन वर्ग खोल्या वाढविण्याची गरज आहे, जेणेकरुन शिक्षक व विद्यार्थी यांना वेगवेगळ्या वर्गात अध्ययन व अध्यापन करणे सुलभ होऊन विद्यार्थ्यांना अभ्यासात गोडील वाटेल.

१२. स्थानिक परिस्थितीनुसार शाळेचे वेळापत्रक व सुटीचे दिवस असावेत :-

ग्रामीण आदिवासी भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून त्या भागातील मुले शेतीचा हंगमा, पाऊस, सण इत्यादी कारणांमुळे त्या हंगामात शाळेत येत नाहीत. त्यासाठी शेतीच्या हंगामात सुट्टी देऊन स्थानिक परिस्थितीनुसार शाळेचे वेळापत्रक व सुट्टीचे दिवस ठरवावेत.

उत्कृष्ट शिक्षणासाठी मोठ्या गुंतवणुकीची व समृध्द भौतिक सामग्रीची गरज आहे, यात शंकाच नाही. पण यातूनही अधिक मानवी प्रयत्नांची गरज आहे. ज्ञानदानाच्या कार्याशी निगडीत असलेले घटक म्हणजे पालक वा समाज, शिक्षक, प्रशासन व पर्यवेक्षण करणारे अधिकारी आणि विद्यार्थी या चौघांची प्रबळ इच्छा व दृढ प्रयत्न यातून शिक्षणाच्या गुणवत्तेचे संवर्धन होणार आहे.

थोडक्यात, आदिवासी भागातील जिल्हा परिषद शाळा व आश्रमशाळा यामधील शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी एका बाजूला प्रशासनाने शाळांतील उणिवा शोधून त्या दूर केल्या पाहिजेत व शाळांवर योग्य ते नियंत्रण ठेवले पाहिजे तर दुसऱ्या बाजूला अध्यापन करणाऱ्या शिक्षकवृंदांनी ज्ञानदानाचे कर्तव्य तळमळीने व नैतिक जबाबदारी समजून करणे आवश्यक आहे. पालकांची जबाबदारीही तितकीच महत्वाची आहे. मुला-मुलींना घरकामासाठी न वापरता त्यांना नियमित शाळेत पाठविणे या बाबी पालकांनी सांभाळल्यास शाळांतील गळतीचे प्रमाण आपोआपच कमी होऊन सुशिक्षित व सुसंस्कृत समाज उभारण्यास त्यामुळे मोठी मदत होणार आहे.

* * *

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

---

विषय - जिल्हा परिषदेच्या शाळा व शासकीय आश्रमशाळा यांच्या शैक्षणिक दर्जाचा तुलनात्मक अभ्यास १९९५-९६.

---

प्रपत्र क्र.-१

गुख्याध्यापकांनी भरावयाचे पत्रक

चौक क्र.-१ शाळेची/आश्रमशाळेची प्रास्ताविक माहिती.

१] शाळेचे/आ. शाळेचे नाव — नांव:- - - - - - - - - - - - - - -
तालुका:- - - - - - - - - - - - -
जिल्हा:- - - - - - - - - - - - -

२] शाळेतील १९९४-९५ ची जातीनिहाय विद्यार्थी संख्या — अनु. जाती - - - - - इ.मा.व. - - -
अनु. जमाती - - - - अन्य - - - -
एकूण विद्यार्थी - - - -

३] शाळेत/आश्रमशाळेत कितवी पर्यंत वर्ग भरतात? — - - - - - - - - - - - - - - - -

४] पुरेसे व योग्य पात्रतेचे शिक्षक आहेत काय? असल्यास — होय/नाही

अ] शाळेतील/आश्रमशाळेतील शिक्षकांची संख्या —
अ] प्राथमिक विभाग:-
प्रशिक्षित शिक्षक - - - - - -
अप्रशिक्षित शिक्षक - - - - - -
ब] माध्यमिक विभाग:-
प्रशिक्षित शिक्षक - - - - - -
अप्रशिक्षित शिक्षक - - - - - -
क] एकूण शिक्षक - - - - - -

५] शाळेचे/आश्रमशाळेचे मुख्यालयापासूनचे अंतर — - - - - - कि.मी.

६] शाळेचे/आश्रमशाळेचे विस्तार अधिकारी कार्यालयापर्यंतचे अंतर व गांव. — कि.मी. - - - - - गांव - - - -

चौक क्र.२ शाळेची इमारत व शैक्षणिक सुविधांबाबत.

१] शाळा गावापासून किती अंतरावर आहे. — - - - - - - कि.मी.

२] शाळेच्या इमारतीचा प्रकार — कच्ची/पक्की

| | | |
|---|---|---|
| ३] | शाळेची इमारत शासकीय गालकीची आहे की भाड्याची आहे? | मालकीची/भाड्याची/ग्रामपंचायत/मोफत/ आदिवासी वि. विभागाच्या मालकीची. |
| ४] | शाळेची इमारत विद्यार्थ्यांसाठी पुरेशी आहे काय? | होय/नाही |
| | अ] अपुरी असल्यास किती विद्यार्थ्यांना पुरते. | विद्यार्थी संख्या - - - - - |
| | ब] पुरेशी न नसल्यास आणखी किती जागा आवश्यक आहे | खोल्यांची संख्या - - - - [खोलीनिहाय क्षेत्रफळ] |
| ५] | शाळेत पुरेसे शैक्षणिक साहित्य [उदा. फळे, पुस्तके, प्रयोगसाहित्य, नकाशे इ.] उपलब्ध आहेत काय? | होय/नाही |
| | अ] नसल्यास त्याची कारणे. | १] - - - - - - - - - - -<br>२] - - - - - - - - - - -<br>३] - - - - - - - - - - - |
| | ब] शैक्षणिक साहित्याची उणिव कशी भरून काढली जाते. | १] - - - - - - - - - - -<br>२] - - - - - - - - - - - |
| | क] पुस्तकी शिक्षणाखेरीज इतर विषयाचे शिक्षण दिले जाते काय? | होय/नाही |
| | असल्यास कोणत्या विषयाचे:- | १] - - - - - - - - - - -<br>२] - - - - - - - - - - - |
| ६] | मुलींसाठी कोणत्या विशेष योजनांचे नियोजन आपल्या शाळेकडून होते. | - - - - - - - - - - - |
| | अ] त्याचा परिणाम काय दिसून येतो? | - - - - - - - - - - - |
| ७] | शाळेस क्रिडांगण आहे काय? असल्यास कोणाच्या मालकीचे | - - - - - - - - - - - |
| ८] | विद्यार्थ्यांना खेळण्याच्या दृष्टीने क्रिडांगण पुरेसे आहे काय? | होय/नाही |
| ९] | शाळेत स्वच्छता गृह, सभागृह, शिक्षकांसाठी खोली इ. सुविधा उपलब्ध आहेत काय? | होय/नाही |

५६ · अ

गोक क्र. ३ अध्यापन व परिक्षा पध्दती

१] घटक नियोजन, वा िक नियोजन व वेळापत्रकाप्रमाणे अभ्यास घेतला जातो का? :- होय/नाही.

२] अभ्यासक्रमाच्या बाबतीत शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या मासिक सभा होतात काय? :- होय/नाही

३] दैनंदिन अध्यापनात कोणती अध्यापन पध्दती वापरतात [उदा:- व्याख्यान पध्दती, प्रश्नोत्तर पध्दती, चर्चा पध्दती इ.] :- १] - - - - - - - -
२] - - - - - - - -
३] - - - - - - - -

४] वरीलपैकी कोणती अध्यापन पध्दती परिणामकारक वाटते? का? :- १] - - - - - - - -
२] - - - - - - - -
३] - - - - - - - -

५] अध्यापनामध्ये स्पष्टीकरणासाठी कोणत्या बोलीभाषेचा उपयोग करता? :- - - - - - - - - - - - - -
अ] त्याचा कोणता परिणाम दिसून येतो? १] - - - - - - - - - -
२] - - - - - - - - - -

६] अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जास्तीचे वर्ग घेतले जातात काय? :- होय/नाही
अ] कोणत्या विषयांसाठी जास्तीचे वर्ग घेतले जातात? :- १] - - - - - - - २] - - - - - - -
ब] त्याचा काय परिणाम दिसून येतो? :- - - - - - - - - - - - - - - - - -

७] अध्यापन दर्जेदार होण्यासाठी शाळेत/आश्रमशाळेत इतर कोणते उपक्रम राबविले जातात? :- १] - - - - - - - - - - - -
२] - - - - - - - - - - - -
३] - - - - - - - - - - - -

८] सध्या आपल्या शाळेत मुलांना वरचे वर्गात घालण्यासाठी कोणती पध्दती अवलंबिली जाते? :- १] - - - - - - - - - - - -
२] - - - - - - - - - - - -

अ] प्रश्नपत्रिका कोण काढतात? :- - - - - - - - - - - - - - -
ब] उत्तरपत्रिका कोण तपासतात? :- - - - - - - - - - - - - - -
क] या पध्दतीत कोणत्या सुधारणा सुचवाव्याशा वाटतात? :- - - - - - - - - - - - - - -

५७

इ] व त्यामुळे कोणत्या प्रकारचा बदल होईल असे आपणास वाटते? :- - - - - - - - - - - - - - - -

ड] परिक्षा पध्दतीमध्ये जाणवणा-या उणिवा कोणत्या? :- - - - - - - - - - - - - - - -

फ] या उणिवा कशा प्रकारे दूर करता? :- - - - - - - - - - - - - - - -

चौक क्र. ४ शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी शाळांना दिलेल्या भेटिंचे मूल्यमापन.

१] शिक्षण विभागाचे अधिकारी शाळेस भेटि देतात काय? :- होय/नाही

भेटि दिल्या असल्यास पुढील तपशिल भरा:-

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | १९९२ तारीख | १९९३ तारीख | १९९४ तारीख | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | जिल्हा शिक्षण अधिकारी | | | | |
| २. | उपशिक्षणाधिकारी | | | | |
| ३. | शिक्षण विस्तार अधिकारी | | | | |
| | भेटींची एकूण संख्या | | | | |

२. शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी भेटीच्या वेळी दिलेल्या शे-याचे गेल्या तीन वर्षातील वर्षनिहाय सारांश वर्णन द्या.

| वर्ष | थोडक्यात शेरा |
|---|---|
| १९९२ | |
| १९९३ | |
| १९९४ | |

३. शाळेची/आश्रमशाळेची प्रतवारी केली जाते का? :- होय/नाही

४. शाळेची प्रतवारी केली जात असल्यास त्याच्या नोंदी तारखेसह लिहा:-

| अ.क्र. | प्रतवारीच्या नोंदी | १९९२ तारीख | १९९३ तारीख | १९९४ तारीख |
|---|---|---|---|---|
| १] | | | | |
| २] | | | | |

५] शालेची वार्षिक तपासणी केली जाते काय? :- होय/नाही

६] वार्षिक तपासणी केली जात असल्यास पुढील तक्ता भरा:-

| अ.क्र. | वार्षिक तपासणी वर्ष | वार्षिक तपासणीतील नोंदी |
|---|---|---|
| १. | १९९४ | |
| २. | १९९३ | |
| ३. | १९९२ | |

७] शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी वरील तपासणीत कोणत्या सूचना केल्या व मुख्याध्यापकांनी त्यावर काय कार्यवाही केली? :- १] --------------
२] --------------
३] --------------
४] --------------

८] ज्या सूचनांवर कार्यवाही केली नाही त्याची कारणे:- १] --------------
२] " --------------
३] --------------
४] --------------

९] भेटी/तपासणी अंतर्गत ज्या सूचना केल्या त्यापैकी किती सूचना शैक्षणिक स्तर वाढविण्याच्या दृष्टीने उपयुक्त होत्या?. :-

| अ.क्र. | उपयुक्त सूचना | १९९२ | १९९३ | १९९४ |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |



..६.

१०] आपल्या बिटमध्ये गटसंमेलने भरविली :- होय/नाही
गेली आहेत काय?
असल्यास आपल्या शाळेतील शिक्षकांना
गटसंमेलनासाठी बोलविण्यात येते का?
येत असल्यास वर्षातून किती वेळा अेक/दोन/तीन

## चौक क्र. ५ शाळेची शैक्षणिक माहिती.

१] प्राथमिक व माध्यमिक शाळेत पास झालेल्या विद्यार्थ्यांची गेल्या १० वर्षातील टक्केवारी.

| वर्ग | पास विद्यार्थ्यांची टक्केवारी | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९८६ | १९८७ | १९८८ | १९८९ | १९९० | १९९१ | १९९२ | १९९३ | १९९४ |
| १ली | | | | | | | | | |
| २री | | | | | | | | | |
| ३री | | | | | | | | | |
| ४थी | | | | | | | | | |
| ५वी | | | | | | | | | |
| ६वी | | | | | | | | | |
| ७वी | | | | | | | | | |
| ८वी | | | | | | | | | |
| ९वी | | | | | | | | | |
| १०वी | | | | | | | | | |

२] चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या :- होय/नाही
विद्यार्थ्यांस बक्षिसे दिली जातात काय?

३] असल्यास कोणत्या स्वरूपात? :- वस्तू/रक्कम/प्रशस्तीपत्रक

४] प्राथमिक व माध्यमिक शाळेतील :- १] इयत्ता १ ते ४ ----- %
विद्यार्थ्यांचे गळतीचे सर्वसाधारण शेकडा २] इयत्ता ५ ते ७ ----- %
प्रमाण किती आहे? ३] इयत्ता ८ ते १० ----- %

५] विद्यार्थ्यांची गळतीची प्रमुख कारणे :- १] -------------
कोणती? २] -------------
३] -------------
४] -------------

६] विद्यार्थीनींची गळतीची प्रमुख कारणे कोणती? :- १] - - - - - - - - - - - -
२] - - - - - - - - - - - -
३] - - - - - - - - - - - -
४] - - - - - - - - - - - -

७] वरील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी शाळेकडून कोणते उपाय केले गेले? १] - - - - - - - - - - - -
२] - - - - - - - - - - - -
३] - - - - - - - - - - - -
४] - - - - - - - - - - - -

८]. शाळेस अध्यापनासाठी लागणारे शास्त्र व भूगोल विषयाचे शैक्षणिक साहित्य वेळेत व पुरेशा प्रमाणात मिळते का? :- होय/नाही

अ] मिळत असल्यास कोणाकडून :- तालुका मुख्यालय/जिल्हा परिषद/ प्रकल्प अधिकारी

ब] नसल्यास त्याची कारणे:- १] - - - - - - - - - - - -
२] - - - - - - - - - - - -
३] - - - - - - - - - - - -

९] सतत गैरहजर राहणा-या विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित ठेवण्यासाठी शाळेने केलेले प्रयत्न :- १] - - - - - - - - - - - -
२] - - - - - - - - - - - -

१०] शाळांमार्फत आयोजित करण्यात येणा-या पुढील बाबतीत सहभाग घेण्याची संधी किती वेळा प्राप्त झाली.

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १] विज्ञान प्रदर्शन | [ ] | [ ] | [ ] |
| २] आदर्श शाळा | [ ] | [ ] | [ ] |
| ३] क्रिडा स्पर्धा | [ ] | [ ] | [ ] |
| ४] लोकनृत्य | [ ] | [ ] | [ ] |
| ५] चित्रकला स्पर्धा | [ ] | [ ] | [ ] |

९] आदिवासी विकास विभागाच्या/शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी शाळेच्या शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी काय सुचना केल्या [ वर्ष १९९४] :- १]
२]
३]

सुचना:-

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

ठिकाण

दिनांक

मुख्याध्यापकांची सही व शिक्का

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे-१.

" जिल्हा परिषदेच्या शाळा व शासकीय आश्रमशाळा यांच्या
शैक्षणिक दर्जाचा तुलनात्मक अभ्यास: १९९५-९६

प्रपत्र क्र. २

शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी भरावयाचे प्रपत्र

१] अधिका-याचे नांव :- - - - - - - - - - - - - - -

२] हुद्दा/पद :- - - - - - - - - - - - - - -

३] मुख्यालय :- - - - - - - - - - - - - - -

४] शिक्षण क्षेत्रातील कामाचा अनुभव :- वर्ष - - - - ग्रामीण ---- शहरी - -

५] अेक विस्तार अधिकारी किती शाळांवर व शिक्षकांवर नियंत्रण करतात? अ] शाळांची संख्या - - - - -
ब] शिक्षकांची संख्या - - - - -

आदिवासी उपविभागातील हे प्रमाण अ] आश्रमशाळांची संख्या - - - -
ब] आश्रमशाळातील शिक्षकांची संख्या ---

६] १९९४-९५ मध्ये बिटमधील शाळांसाठी गटसंमेलने/शैक्षणिक शिबीरे भरविली काय? भरविली असल्यास किती? :- होय/नाही

अ] वरील शिबिरांना आश्रमशाळेतील शिक्षकांना बोलाविण्यात आले होते काय? :- होय/नाही

ब] नसल्यास कारणे :- १] - - - - - - - - - - - - -
२] - - - - - - - - - - - - -
३] - - - - - - - - - - - - -

७] शिक्षकांसाठी विशेष मार्गदर्शनपर शिबिर भरविली जातात काय? :- होय/नाही
वर्षातून किती :-

८] आश्रमशाळेतील शिक्षकांचा यामध्ये सहभाग असतो का? :- होय/नाही

क] नसल्यास कारणे :- १] - - - - - - - - - - - - -
२] - - - - - - - - - - - - -

९] पुरक उपक्रम उदा. वाचन, लेखन, कथाकथन नाट्यीकरण, चित्रकला, विज्ञानप्रदर्शन, क्रिडा स्पर्धा, परिसर अभ्यास इ. कार्यक्रम आपल्या बिटमधील शाळांमध्ये आयोजीत केले जातात काय? :- होय/नाही

अ] आश्रमशाळेतही वरील उपक्रम राबविले जातात काय? :- होय/नाही

ब] नसल्यास कारणे? 1] - - - - - - - - - - - -

2] - - - - - - - - - - - -

3] - - - - - - - - - - - -

क] आपण या संदर्भात आश्रमशाळांना काय मार्गदर्शन केले? 1] - - - - - - - - - - - -

2] - - - - - - - - - - - -

3] - - - - - - - - - - - -

10] शालासंबंधीची नियतकालीके व सांख्यिकी माहिती आश्रमशाळांकडूनही मागविली जाते का? :- होय/नाही

अ] नसल्यास कारणे? 1] - - - - - - - - - - - -

2] - - - - - - - - - - - -

3] - - - - - - - - - - - -

11] शिक्षकाचे बाबतीत अनियमितपणा बेशिस्त आढळून आल्यास काय उपाययोजना करता? 1] - - - - - - - - - - - -

2] - - - - - - - - - - - -

अ] वरील नियम आश्रमशाळांमधील शिक्षकांनाही लागू आहे काय? :- होय/नाही

ब] नसल्यास कारणे :- 1] - - - - - - - - - - - -

2] - - - - - - - - - - - -

12] वार्षिक नियोजनाप्रमाणे आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व प्राथमिक शाळांना व आश्रमशाळांमध्ये भेटी देऊन तपासणी करता काय? :- होय/नाही

असल्यास मागील वर्षातील भेटींची सर्वसाधारण संख्या - - - - - - - - - - - -

| | आश्रमशाळा | जि. प. शाळा |
|---|---|---|
| भेटींची संख्या | | |
| तपासणी | | |

80-38

१३] आदर्श पाठ व चर्चा सिटमध्ये घेतली जाते काय? :- होय/नाही

अ] घेतली जात असल्यास आश्रमशाळांना निमंत्रीत केले जाते काय? :- होय/नाही

ब] निमंत्रीत केले जात असल्यास :- चर्चेत सहभागी होण्यासाठी/आदर्श पाठाचे वाचनासाठी.

१४] आश्रमशाळांमध्ये शैक्षणिक शिबिरे/गटसंमेलने भरविली गेली काय? :- होय/नाही

अ] भरविली गेली असल्यास केव्हा? - - - - - - - - - - - - - - -

ब] नसल्यास कारणे?

१] - - - - - - - - - - - - - - -

२] - - - - - - - - - - - - - - -

१५] या बिटमध्ये शाळा समूह योजना राबविली जाते काय?

१] - - - - - - - - - - - - - - -

२] - - - - - - - - - - - - - - -

अ] असल्यास आश्रमशाळांना त्यामध्ये सहभागी करुन घेतले गेले आहे का? :- होय/नाही

ब] नसल्यास कारणे?

१] - - - - - - - - - - - - - - -

२] - - - - - - - - - - - - - - -

ठिकाण :---------------

दिनांक :---------------

सही/-
नांव/-
हुद्दा/-

शिवरात्री/१७११९५

ε)